किंमत १२ आणे

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

दिवाळी अंक

दिवाळी अंक

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ अंक ४२

पुणें, बुधवार ता. २३ आक्टोबर १९४६




प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.

## दि डेक्कन ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लिमिटेड, पुणें.

( मुख्यतः साखर तयार करण्याकरितां सन १९१३-३६ च्या हिंदी कंपन्यांच्या कायद्यान्वयें स्थापन झालेली )

अधिकृत आणि विक्रीस काढलेलें भांडवल रु.१०,००,००० ( दहा लाख ) खालीलप्रमाणें विभागलें आहेः—
४,०००-५ टक्के करमाफ क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येक रु. १०० चा
१२,०००-ऑर्डिनरी शेअर्स, प्रत्येक रु. ५० चा

सर्व अधिकृत भांडवल विक्रीस काढलेलें आहे. शेअर्सच्या रकमा खालीलप्रमाणें भरावयाच्या आहेत. प्रेफरन्स शेअर्स-रु. २५ अर्जासोबत, रु. २५ अर्ज-मंजुरीनंतर, रु. २५ प्रत्येक मागणीच्या वेळीं
ऑर्डिनरी शेअर्स-रु. १५ अर्जासोबत, रु. १५ अर्ज-मंजुरीनंतर, रु. १० प्रत्येक मागणीच्या वेळीं.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

चेअरमन—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित, फर्स्ट क्लास सरदार ऑफ दी डेक्कन, कौन्सिल ऑफ स्टेटचे माजी सभासद, श्रीभाऊमहाराज निकेतन, टिळक रोड, पुणें २.

— डायरेक्टर्स —

( १ ) सरदार रा. ब. व्ही. एल. दुबे, एम. एल. ए.
( २ ) श्रीमंत सरदार व्ही. एन. मुतालिक, बी. ए.
( ३ ) दिवाणबहादुर एन. सी. लिमये, बी. ए., एलएल.बी., सी. बी. ई.
( ४ ) से. ले. रावसाहेब मोहनलाल चिमणलाल माणियार, एम. बी. ई.
( ५ ) श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए.
( ६ ) श्री. व्ही. पी. कोकील, एम. ए., एस. टी. सी. डी.
( ७ ) श्री. शं वि. कुलकर्णी, लँडलॉर्ड व बँकर
( ८ ) श्री. श्री. द. कुलकर्णी, लँडलॉर्ड व बागाईतदार
( ९ ) श्री. बी. व्ही. मुतालिक, बी. ए., बी. कॉम.
( १० ) श्री व्ही. जी. चिवटे, एम. ए. ( अर्थशास्त्र )

### कंपनीबाबत कांहीं महत्त्वाच्या ठळक गोष्टी—

- *एक महिन्याचे अल्पावधींत २॥ लक्ष रुपयांचे शेअर्स खपले असून शेअरविक्री रोज चालू आहे.*
- *कंपनीची एकूण मालमत्ता ५ लाखांचेवर आहे.*
- *४०० टन ऊस रोज गाळला जाईल अशा प्रकारची माशिनरी मेसर्स स्कोडा वर्क्स, लि., प्राग, झेकोस्लोव्हाकिया यांचेकडून मागविलेली आहे. त्यासाठीं रु. १,१३,००० वर अगाऊ रकम भरली असून ही मशिनरी १९४७ च्या जूनमध्यें येऊन १९४७-४८ चा हंगाम चालू करतां येईल असा अंदाज आहे.*
- *कंपनीनें एकूण २,००० एकरांचेवर जमिनी मिळविल्या असून चालू सालीं १,००० एकर उसाची लागवड करण्यांत येणार आहे व १,००० एकर जमीन अन्नधान्याच्या उत्पादनासाठीं उपयोगांत आणली जाईल.*

विशेष माहितीसाठीं लिहा—

मॅनेजिंग एजंटस्:—मेसर्स चिवटे, मुतालिक अँड कंपनी, बुधवार चौक, पुणें २.

दि सदर्न निटिंग वर्क्स
लि. पुणें २
ह्यांनीं तयार केलेली
होजिअरी
★ सर्व प्रकारचा सुती, लोकरी आणि जाळीचा, निरनिराळ्या डिझाइन्समधील माल.
★
इंटरलॉक अंडरवेअर्स व शर्टस
★
एस. व्ही. सुपनेकर कुलकर्णी अँड सन्स लि.
मॅनेजिंग एजंटस

विजय
टेक्स्टाइल्स लि.
—येरंडवणा पुणें ४—
आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.
शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.
मॅनेजिंग एजंटस्.

—पेटंट—
बेळगांव इस्तरी
( प्लेन आणि टेपर डिझाइन्स. )
फयामिली, शिंपी आणि धोबी यांचेकरितां
हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या कोणत्याही इस्तरी पेक्षां सर्व तऱ्हेनें उत्कृष्ट
—: बनविणार :—
मेसर्स गरगट्टी आणि सन्स मेटल वर्क्स
शहापूर—बेळगांव S. M. C.

# दि बँक ऑफ औंध लि.

( औंध संस्थानांत नियमित जबाबदारीची म्हणून स्थापन झालेली )

अधिकृत भांडवल ... ... रु. ५,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल ... रु. २,५०,०००
खपलेलें व भरणा झालेलें ... रु. १,४४,५२०
खेळतें भांडवल ... ... रु. २०,००,००० चे वर
रिझर्व्ह व इतर फंड्स ... रु. ४२,००० चे वर.

मुख्य कचेरीः— औंध

—शाखा—

आटपाडी, बिचूद रे. स्टे. व ओगलेवाडी.

संचालक मंडळ

१. श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए., कागदाचे व्यापारी, पुणें २ ( चेअरमन )
२. श्री. ना. रामप्पा बाळप्पा बिद्री, बी. ए., एलएल. बी., पंतप्रधान सं. औंध.
३. श्रीमंत ना. बापूसाहेब पंत, युवराजसाहेब सं. औंध.
४. श्री. ना. वसंत श्रीपाद सातवळेकर, बी. ए., औंध.
५. श्री. शुभकर्णशेठ बोत्रा, व्यापारी, बिचूद रे. स्टे.
६. श्री. महादेव परशुराम राजहंस, बिचूद रे. स्टे.
७. श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बेळगांव बँक लि.

( स्थापना १९३० ) हेड ऑफिस—बेळगांव

शाखा—संकेश्वर, होसूर, गोकाक, कँप-बेळगांव, वेंगुर्ला, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, धारवाड, नरगुंद, शिरोडा, कणकवली, निपाणी.

अधिकृत भांडवल १०,००,०००-०-०
विक्रीस काढलेलें भांडवल ३,५०,०००—०—०
खपलेलें व वसूल झालेलें भांडवल ३,५०,०००—०—०
एकूण खेळतें भांडवल, अजमासें ५०,००,०००-०-०
एकूण ठेवी ४० लाखांचे वर.

आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात, व सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

बँकेनें दरसाल दर शेंकडा ४ टक्के व्याज देणारी पांच वर्षे मुदतीचीं कॅश सर्टिफिकेट्स काढलीं आहेत. अर्जाचे नमुन्यासाठी लिहा.

आतापर्यंत बँकेनें भागीदारांना इन्कमटॅक्स वजा जातां कमींत कमी ६½ टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

( प्रत्येक शेअर १० रु. चा आहे. )

विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा

श्री. जी. एन. कुलकर्णी, चेअरमन

श्री. एच. एस. कुलकर्णी, बी. ए, मॅनेजर
श्री. एम. जी. हेरेकर, बँकर, व्हाईस चेअरमन

( हें प्रॉस्पेक्टस् नसून माहितीपत्रक आहे. )

प्रॉस्पेक्टसची मूळ इंग्रजी प्रत रजिस्ट्रार ऑफ जॉइंट स्टॉक कंपनीज, मुंबई, यांच्याकडे नोंदविली आहे.

# महाराष्ट्र इंजिनियरिंग वर्क्स लिमिटेड

( सन १९१३ च्या हिंदी कंपन्यांच्या कायद्यान्वयें स्थापन झालेली )

**अधिकृत भांडवल : रु. २५,००,०००** — प्रत्येकीं रु. १०० च्या २५००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें

**विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००,०००** — प्रत्येकीं रु. १०० च्या ५००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें

शेअर्सच्या अर्जासोबत प्रत्येकीं रु. २५ व अर्जमंजुरीनंतर रु. २५ देण्याचे आहेत. बाकी रक्कम रु. ५० मागणीप्रमाणें रु. २५ च्या हप्त्यांनीं शेअरमंजुरीनंतर ३ महिन्यांपक्षां कमी नव्हे अशा मुदतींत भरावयाचे आहेत.

डायरेक्टर्सः—१ श्री. एन्. एस. गुपचुप, बी. ई., बी. एससी. ( एडिंबरो ), ए. एम्. आय्. सी. ई. ( लंडन ), ए. एम्. आय. ई. ( इंडिया ), युनायटेड इंडिया बिल्डिंग्ज, सर फिरोजशहा मेहता रोड, ( चेअरमन ) ... ... मुंबई

२ श्री. जी. व्ही. पुराणिक, पनवेल
३ श्री. मुरारजी जे. वैद्य, बी. कॉम., एफ. आर. इ. एस., मुंबई
४ श्री. जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई
५ श्री. सी. जी. आगाशे, बी. ए., एलएल. बी., पुणें
६ श्री. एस. एम. जोशी, पुणें २
७ श्री. एम्. एस. पारखे, बी. ए., पुणें २
८ श्री. व्ही. एम्. देवल. बी. कॉम., पुणें २
९ श्री. डी. व्ही. पोतदार, बी ई. ( मेकॅ. ), बी. ई. ( इले. ), ए. एम. आय. ई. ( इंडिया ), चार्टर्ड इंजिनिअर ( एक्सऑफिशिओ ) पुणें

बँकर्सः—१ बँक ऑफ महाराष्ट्र लि., २ युनायटेड कमर्शिअल बँक लि., ३ पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मॅनेजिंग एजन्टसः— मे. पोतदार अँण्ड कंपनी, १८० शनवार पेठ, पुणें २.

ऑडिटर्स : श्री. जी. डी. आपटे, बी. ए., जी. डी. ए., रजिस्टर्ड अकौंटंट्स. पुणें २

रजिस्टर्ड ऑफिस—१८० शनिवार पेठ, पुणें २.

कंपनीचे उद्देश व कार्यक्षेत्र

कंपनीच्या मेमोरँडममध्यें अंतर्भूत केलेल्या हेतूनुसार पुणें येथें मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगचीं कामें करणें, तसेंच मशिनरी तयार करणें व दुरुस्त करणें आणि त्यासाठीं वर्कशॉप चालविणें हे कंपनीचे मुख्य उद्देश आहेत.

प्रस्तुत इंजिनिअरिंग वर्क्स कारखानदारांना भासणारी एक मोठी उणीव भरून काढीत असून कंपनीच्या प्रवर्तकांना अशा कारखान्याच्या वाढीबद्दल व सुवितव्याबद्दल पूर्ण विश्वास वाटत आहे.

कारखान्यासाठीं यंत्रसामुग्रीची ऑर्डर दिली असून शहरांत जवळपास चांगली जागा मिळविण्यासाठीं बोलणें चालू आहे व लवकरच जागा मुक्रर केली जाईल.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें.

हेड ऑफिसः-प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखाः-इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

---

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ६,७७,६४१ |
| खेळतें भांडवल | रु. ५८,००,००० |

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष.

श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**गो. धों. जोगळकर,**
बी. ए. (ऑ.), बी. कॉम.,
एलएल. बी.,
मॅनेजर.

**चिं. त्रिं. चितळे,**
मॅ. डायरेक्टर.



नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक, म्हणजेच

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

स्थापना सन १९१०

हेड ऑफिसः—नगर शहर

शाखा—१ संगमनेर (जि. नगर) २ भिंगार (ता. नगर)
३ बेलापूर रोड (जि. नगर) ४ कोपरगांव (जि. नगर)

भांडवल

| | |
|---|---|
| अधिकृत व काढलेलें भांडवल ... | रु. २,००,००० |
| भरलेलें भांडवल ... | रु. १,७०,००० |
| खेळतें भांडवल ... | रु. ६४,८८,५३४ |
| चालू ठेवी ... | रु. ४४,०२,८४३ |
| मुदत ठेवी ... | रु. ८,८०,८९६ |
| सेव्हिंग्ज ठेवी ... | रु. ६,७९,७३६ |
| रिझर्व्ह फंड ... | रु. १,७८,७६६ |
| इतर फंड ... | रु. १,५८,३८१ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंडी, सरकारी रोख्यांची खरेदी विक्री वगैरेचा सर्व व्यवहार केला जातो.

दागदागिने, मौल्यवान वस्तु व कागदपत्र सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची योजना जिल्ह्यांत फक्त या बँकेंतच आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

तारीख १८—९—४६

मो. कुं. फिरोदिया
चेअरमन



# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना १९३५ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. १,००,०५० |
| रिझर्व्ह फंड | रु. १५,१०१ |
| इतर फंडस् | रु. १६,०३९ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ११,७४,२८२-१३-७ |

चेअरमन :

श्री. गणेश कोंडो गोडबोले, B. A., LL. B.

★ बँक स्थापनेपासून बँकेनें ६¼% प्रमाणें सभासदांस डिव्हिडंड दिलें आहे.

★ माफक दरानें सोनें, माल व स्थावर मिळकत, सरकारी रोखे, शेअर्स वगैरेचे तारणावर कर्ज दिलें जातें.

★ योग्य जामीन दिलेस कॅशक्रेडिट व लोन दिलें जातें.

★ सर्व प्रकारचे बिलांची वसुली व मुंबई, पुणें, किर्लोस्करवाडीचे चेकस व इतर बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A., LL. B.
मॅनेजर.



# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

( स्थापना : १९२९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. २,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १,००,००० |
| प्रत्येक शेअरचे रु. १०० प्रमाणें वसूल झालेलें ... | रु. २०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ३,००,०००चे वर |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८२,००,०००चे वर |

डायरेक्टर्स

१ रावसा. वि. पां. वेडेकर, बी. एस्सी., बी. ई. (चेअरमन)
२ डॉ. कृ. गो. गोसावी, एल्. सी. पी. एस्.
३ रावसा. वि. स. आपटे, बी. ए., एलएल. बी.
४ श्री. गो. वि. सखदेव
५ श्री. ब. ग. आगाशे

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ मोडनिंब, कुर्डूवाडी व पंढरपूर

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

के. डी. शिराळकर
मॅनेजर.

वर्ष १२ वें | अर्थ | अंक ४२वा
बुधवार, ता. २३ आक्टोबर १९४६

# संक्रमण काळांतील दीपावली

## यशश्चिंतन

दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाल्यानंतरची ही दुसरी दिवाळी आहे. जर्मनी व जपान ह्यांच्या जागतिक आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार करून, मानवी जीवित व संस्कृति, हीं शाबूत ठेवण्याची बाकीच्या राष्ट्रांनीं पराकाष्ठा केली. तथापि, अद्याप युद्धाच्या विजयाचीं फळें चाखण्यास मिळूं लागलेलीं नाहींत. युद्धाच्या धामधुमीच्या काळांत, विजयप्राप्तीच्या एकाच ध्यासानें सर्व व्यवहार आखले गेले आणि नियंत्रणें बसविण्यांत आलीं. व्यक्तीपेक्षा राष्ट्र श्रेष्ठ आहे आणि एका राष्ट्रानें इतर राष्ट्रांसाठी त्याग केल्याविना कोणासच शांतता व सुख मिळणार नाहीं, ह्या तत्त्वाचा अवलंब प्रसंगाच्या गंभीरपणामुळें आपोआपच केला गेला. जगाचा युद्धोत्तर संसारहि ह्याच दृष्टीनें अखंड चालावा म्हणून कित्येक जागतिक संस्था निर्माण करण्यांत आल्या आहेत. तथापि, त्यांच्या व्यवहारांत एकजूट असावी तितकी आढळून येत नाहीं. शत्रुराष्ट्रांशीं करावयाच्या तहनाम्यांचा प्रश्नहि अद्याप सुटण्याच्या मार्गावर नाहीं.

इकडे, हिंदुस्थानांत, आर्थिक व अन्न-परिस्थिति बिकट झाली आहे आणि त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न लोकमतानुवर्ती प्रांतिक सरकारें करीत आहेत. मध्यवर्ती सरकारामध्येंहि जनतेच्या पुढाऱ्यांनीं प्रवेश केला आहे, परंतु राजकीय व जातीय सलोख्याचा अभाव ही प्रगतीच्या मार्गांतील अत्यंत मोठी अडचण नाउमेद निर्माण करूं पहात आहे. स्वातंत्र्य अगदी जवळ येऊन ठेपलें असून त्याचा उपभोग सत्वर मिळूं शकेल ह्या अपेक्षेनें जनता वास्तविक आनंदांत मग्न असावयास हवी. परंतु सध्याच्या संक्रमण काळांत कार्यांचा डोंगर समोर दिसत असतांनाहि आपल्या पुढाऱ्यांची शक्ति आपसांतील मतभेद दूर करण्याच्या प्रदीर्घ वाटाघाटींत खर्च होत रहावी आणि सामान्य नागरिकांचें जीवित धोक्याचें बनून आर्थिक व्यवहारास बाधा व्हावी, ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. अशा परिस्थितींतहि, महाराष्ट्रीयांचें लक्ष उद्योगधंद्यांकडे अधिकाधिक वळत आहे आणि नवे नवे उपक्रम ते हातीं घेत आहेत, ह्याबद्दल समाधान वाटतें. आज महाराष्ट्रापुढें व हिंदुस्थानापुढें कोणते प्रश्न आहेत आणि ते सोडविण्याचे मार्ग कोणते, ह्याचें दिग्दर्शन आमच्या ह्या दिवाळी अंकांत वाचकांस मिळेल. औद्योगिक व आर्थिक परिस्थितीचें प्रतिबिंबहि त्यांस सर्वत्र उमटलेलें आढळून येईल. दरिद्री महाराष्ट्रांत, सहकारी किंवा जॉइंट स्टॉक पद्धतीनेंच मोठे उपक्रम चालू झालेले आहेत व होत आहेत. त्यांत यश मिळण्यास परस्पर विश्वास, चालकांची सचोटी व दीर्घोद्योग, पैसे गुंतवणारांची जागरूकता आणि उद्योगधंद्यांबद्दल त्यांची आपुलकी, इत्यादि गुणांच्या विकासाची आवश्यकता आहे. दिवाळीचा सण व येतें वर्ष आमच्या वाचकांस आणि हितचिंतकांस आनंदाचें व समृद्धीचें जावो आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचें पाऊल सावधगिरीनें, धैर्यानें व एकजुटीनें पुढें टाकलें जावो, असें आम्ही इच्छितों.

महाराष्ट्रीयांस आर्थिक विषयांची गोडी लागून, उद्योगधंद्यांकडे त्यांचें लक्ष वळावें, ह्या हेतूनें "अर्था"ची १९३५ सालीं स्थापना करण्यांत आली. त्यानंतरच्या काळांत महाराष्ट्रानें आजवर केलेली प्रगति अवलोकन केली, तर आपणास पुढें उज्ज्वल भवितव्य आहे, असा विश्वास वाटतो. कोणत्याहि गोष्टीस चालना मिळाल्यानंतर गति येण्यास थोडासा वेळ लागतो. महाराष्ट्रीय मनोवृत्ति उद्योगधंद्यास अनुकूल करण्याचें प्राथमिक आणि महत्त्वाचें कार्य आतां बरेचसें पुरें झालें आहे. महत्त्वाकांक्षी तरुण व्यापार व कारखानदारी ह्यांकडे आकर्षित होऊं लागले आहेत, आणि त्यांस समाजाची मान्यताहि मिळूं लागली आहे. वेळोवेळ उपस्थित होणारे आर्थिक प्रश्न आणि होणाऱ्या घडामोडी ह्यांचा परामर्श "अर्थ" घेत आला आहे आणि व्यापार, शेती, कारखाने, बँकिंग, विमाव्यवसाय, इत्यादि बाबत आपल्या वाचकांस संगतवार माहिती पुरवून त्यांस योग्य निर्णय स्वतःच घेतां यावेत अशी पार्श्वभूमि निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न सतत चालू आहे. "अर्था" चे संस्थापक गेल्या जानेवारींत निवर्तले. त्यांच्यानंतर, सध्याच्या संपादकांनींहि "अर्था" चें प्रगतिपर धोरण कायम राखण्याचा निश्चय केला आहे. "अर्था" चे सहाय्यक आणि हितचिंतक ह्यांच्या मदतीचा येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे. त्या सर्वांस नवें वर्ष सुखाचें जावो, असें पुनः एकवार चिंतितों.

**हा उत्तर ध्रुव कोठें आहे ?**—ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ सर स्पेन्सर जोन्स ह्यांनीं पृथ्वीच्या लोहचुंबकाच्या क्षेत्राचें गणितशास्त्रदृष्ट्या पृथक्करण करून, उत्तर ध्रुवाच्या प्रदेशाचे नकाशे काढण्याचें ठरविलें आहे. हल्लीं ज्या ठिकाणीं उत्तर ध्रुवाचें केंद्र आहे असें समजण्यांत येतें, त्यापेक्षा २५० ते ३०० मैल उत्तरेला तें असावें असा त्यांचा निष्कर्ष आहे. उत्तर ध्रुव प्रदेशांतील हवामानाचे बरोबर अंदाज वर्तवतां आले तर मध्य-आशियांतील शेतकऱ्यांना त्याचा फार उपयोग होईल. त्या दृष्टीनें या संशोधनास महत्त्व आहे.

**डेन्मार्क-पोलंड मधील व्यापार**—पोलंड व डेन्मार्क यांच्या दरम्यान नुकताच एक व्यापारी करार करण्यांत आला. पोलंड डेन्मार्कला १२ लाख, ५० हजार टन कोळसा देणार असून त्याच्या बदला ४४ हजार घोडे व ६० हजार दुभतीं गुरें घेणार आहे. नव्या युरोपच्या आर्थिक देवाण-घेवाणीला वस्तूंच्या अदलाबदलीचें आलेलें हें स्वरूप लक्षांत घेण्यासारखें आहे. पोलंडमधील शेतीला नांगरासाठी घोडे व इतर जनावरांची अत्यंत जरूर आहे. कारण, पोलंडमधील जर्मनांनीं केलेली नासधूस व लूट अपरिमित स्वरूपाची होती.

# किंमती आणि कमाई ह्यांचा समन्वय

लेखक:—प्रिन्सिपॉल द. गो. कर्वे, एम. ए.

युद्ध संपून एक वर्ष झालें, तरी अजून किंमती उतरत नाहींत, वाढतच आहेत. उलट लढाईच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कामाकरतां सर्व प्रकारच्या कामगारांना वाढता रोजगार मिळत होता तो आतां कमी होत आहे. कित्येक कामगार कामावरून कमी केले जात आहेत, व जे कामावर आहेत त्यांस जादा पाळीचा भत्ता, बोनस वगैरे मार्गांनीं मिळणारे पैसे कमी होत आहेत. किंमती आणि कमाई यांची शर्यत युद्धकाळांत बहुजन समाजाला जेवढी जाचक होत होती त्याहूनही ती आतां अधिक जाचक होऊं लागली आहे. कारखाने, खाजगी मंडळया, सरकारी खातीं, ह्या सर्वांचा नोकरवर्ग असंतुष्ट असून संपांची चवळ जोरांत पसरत आहे. प्राप्त परिस्थितीला तोंड दिलेंच पाहिजे म्हणून प्रत्येक प्रकारचा मालक वर्ग जमेल त्या अटींवर नोकरवर्गाशीं तडजोड करीत आहे. परंतु किंमतींचें मान कोठेंच स्थिर होत नसल्यानें आणि उलट व्यापारधंद्यांची स्थिति अधिकच अनिश्चित झाल्यानें कामगार व मालक ह्या दोन्हीं वर्गांत हल्लीं नाउमेद व असंतोष पसरलेला आहे. ही परिस्थिति अशीच कांहीं काळ चालू राहिल्यास आर्थिक प्रगति खुंटेल, एवढेंच नव्हे तर व्यापार-उदीमांत कांहीं तरी तुफानी घडामोडी होऊन मंदी सुरू होईल.

### राष्ट्रीय धोरणाची आवश्यकता

बाजारभावांची कोणती तरी धारण निश्चित धरून मजुरी, पगार, भाडीं, नफा, व्याज इत्यादि स्वरूपांच्या कमाईचे दर त्या त्या वर्गास राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानानें न्याय्य व किफायतशीर रहातील असें धोरण आंखून त्याची परिणामकारक अंमलबजावणी केल्याखेरीज हलाखी आणि विषमता ह्यांचें निर्मूलन होणार नाहीं, आणि व्यापारधंदाही सुस्थितींत राहणार नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्यांसारख्या देशांत नेहमींच, आणि विशेषतः युद्धकाळांत आणि युद्धोत्तर काळांत, किंमती आणि कमाई ह्यांचें समप्रमाण राखण्याचें धोरण अवलंबिलें जातें. अजूनहि हे दोन्हीं देश बहुतांशीं व्यक्तिप्रधान असल्यानें मालाची निपज, भांडवलाची गुंतवणूक, रोजगाराची निवड आणि गिऱ्हाइकांच्या खरेदी ह्यांबद्दल कमीअधिक प्रमाणांत नागरिकांस स्वातंत्र्य देण्यांत येतें. परंतु एकंदर मालाचा पुरवठा, किंमती आणि भिन्न वर्गांची कमाई ह्यांच्यांत एकसूत्रीपणा येण्यापुरतें जरूर तें नियंत्रण ठेवलें जातें. हिंदुस्थान सरकारचें धोरण ह्या बाबतींत आतांपर्यंत राष्ट्रीय हिताचा पद्धतशीर विचार करून आंखलेलें नसल्यानें तें यशस्वी होऊं शकलें नाहीं. सामान्य जनता व उत्पादक वर्ग ह्यांचें सहकार्यही त्यास मिळवितां आलें नाहीं. सुदैवानें ह्या बाबतींत आतां परिस्थिति सुधारली आहे व किंमती, रोजगार आणि कमाई ह्यांच्या समन्वयाचें राष्ट्रीय धोरण आंखणें शक्य आणि आवश्यक झालें आहे.

### शेतीकडे दुर्लक्ष नको

आपापल्या परीनें सर्वच धंदे महत्त्वाचे आहेत. परंतु आपल्या देशांत शेतीचा धंदा मूलभूत महत्त्वाचा असल्यानें शेती मालाच्या किंमती शेतकऱ्यांस परवडतील अशा ठेवणें ही किंमत–कमाई समन्वयाची पहिली पायरी आहे. दुष्काळी परिस्थितीनें मिळणारे भाव कायम टिकणारे नाहींत व इतर वर्गांवर त्यांचा बोजा अवास्तव पडतां कामा नये. म्हणून दीर्घकालीन योजनेंत शेतीमालाच्या किंमती त्यांच्या उत्पादनखर्चावरूनच ठरविल्या पाहिजेत. हिंदुस्थानांतील किंमती तिप्पट वाढल्या आहेत, परंतु ज्या इतर देशांतून आतां इकडे माल येऊं शकेल त्यांमध्यें त्या दीड ते पावणे-दोन पटींपेक्षां अधिक वाढलेल्या नाहींत ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. क्रमाक्रमानें शेती जिनसांचे भाव साधारणतः युद्धकालापूर्वीपेक्षां दुपटीवर स्थिर केले पाहिजेत. त्याहून ते पुढें अधिक घसरूं लागल्यास शेतकऱ्यांस जरूर तें साहाय्य आणि संरक्षण मिळालें पाहिजे. आतांपर्यंत इतर धंद्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संरक्षण कांहीं प्रमाणांत मिळत गेलें, परंतु मंदीच्या काळांत शेतकऱ्याकडे कोणींच पाहिलें नाहीं. असें पुन्हां होतां कामा नये. शेती-मालाची किंमत ठरल्यानंतर त्या प्रमाणांत इतर धंद्यांच्या मालाची किंमतही ठरविली पाहिजे. बाजारभावांची धारण भक्कम पायावर अशी सुसूत्र बसविली म्हणजे त्या प्रमाणांत कमाईचें मानही प्रत्येक धंद्याच्या परिस्थितिप्रमाणें ठरेल व कोणत्याहि प्रकारच्या धंदेवाल्याला, व्यापाऱ्याला अगर रोजगारदाराला न्याय्य तक्रार राहणार नाहीं.

### आर्थिक धोरणाचें उद्दिष्ट

किंमती ठरविल्या पाहिजेत, ह्याचा अर्थ सर्व पदार्थांच्या बाबतींत शिधापद्धत व भावनियंत्रण केलें पाहिजे असा नाहीं. सामान्य उपयोगाच्या आवश्यक जिनसांचा पुरवठा मर्यादित आणि बराचसा अपुरा असेपर्यंत त्या जिनसांपुरतें कांहीं काळ वाटपाचें आणि भावाचें नियंत्रण आवश्यक आहे. पुरवठ्याच्या परिस्थितींत सुधारणा होईल अशी खात्री वाटल्याखेरीज नियंत्रण दूर करण्यापासून सामान्य जनतेचें अनहित होईल, एवढेंच नव्हे तर क्रमशः कोणत्याच बाजारभावांत मेळ न राहून कमाई आणि किंमती ह्यांची घडी बसविणें अशक्य होईल. कांहीं जिनसांपुरतें आणि कांहीं काळ नियंत्रण आवश्यक ठरलें तरी नियंत्रण हें आर्थिक धोरणाचें उद्दिष्ट नव्हे. गिऱ्हाइकांस व धंदेवाल्यांस लागणाऱ्या मालाचा पुरवठा वाढविणें हेंच आर्थिक धोरणाचें उद्दिष्ट होय. प्रत्येक धंद्याची कार्यक्षमता व क्षेत्र ह्यांत वाढ झाली पाहिजे आणि ती होण्यास विधायक व उत्तेजक धोरण सरकारनें आंखलें पाहिजे. चलन, पेढ्या, व्याजाचे दर, भांडवलाचा पुरवठा, यंत्रें व इतर उत्पादक साधनांची आयात, वहातुक, जकाती, सरकारी करांचे दर, परराष्ट्रीय व्यापार इत्यादि सर्व क्षेत्रांत शेती आणि इतर धंदे ह्यांच्या संवर्धनाचें कार्य सरकारनें अंगिकारलें पाहिजे. आर्थिक संवर्धनाचाच एक भाग ह्या दृष्टीनें किंमती आणि कमाई ह्यांच्या समन्वयाकडे पहाणें इष्ट आहे. ह्या बाबतींत आपलें धोरण जाहीर करून नव्या राष्ट्रीय सरकारानें तात्काळ उपाययोजना सुरू केली पाहिजे.


## दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ सांगली, ३ शाहुपुरी, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,१०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,२३,६०० |

खेळतें भांडवल अंदाजें ३० लाखांवर

—: अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात. :—

# हाडांचा खतासाठीं उपयोग

## ग्रामीण भागांस सोइस्कर पडणारी उत्पादनपद्धति

लेखक:—रा. ब. डॉ. प्रो. द. ल. सहस्त्रबुद्धे, एफ. ए. एससी., डी. एससी., एम. एजी., एम. एससी.

आज कित्येक महिने हिंदुस्थानांत अन्नधान्याचा तुटवडा भासत आहे व त्यामुळें ' अधिक धान्य पिकवा ' असें सर्व शेतकऱ्यांना सांगण्याची मोहीम सरकारनें चालू ठेवली आहे. हल्लींपेक्षा जास्त धान्य पिकविणें अवश्य झालें आहे, ह्याकरिता सर्व बाजूनें खटपट झाली पाहिजे. जमिनीचा कस वाढविणें हा एक उपाय आहे तो इतर उपायांमध्यें सामील केला पाहिजे. शास्त्रीय पद्धतीनें जेथें शेती करतात त्या ठिकाणीं जमिनीमध्यें पिकांना लागणारीं सर्व प्रकारचीं द्रव्यें योग्य प्रमाणांत आहेत किंवा नाहींत हें पाहतात. योग्य प्रमाणांत नसल्यास तीं खताचे रूपानें घालतात. महाराष्ट्रांतील पुष्कळशा जमिनींत फास्फेटस् असाव्या इतक्या प्रमाणांत नाहींत. तेव्हां जमिनी सर्व प्रकारें सकस होण्याकरतां त्यांतली फास्फेटस्‌ची उणीव भरून काढली पाहिजे. फास्फेटस् हाडांत मोठ्या प्रमाणांत सांपडत असल्यानें या कामीं हाडें खतासाठीं उपयोगांत आणणें उपयुक्त ठरेल.

### आतांपर्यंतचा अनुभव

सरकारनें जे खतासंबंधाचे आतांपर्यंत प्रयोग केले त्यांत भातशेतीला आणि केळीं, अंजीर, मुसंबी वगैरे फळबागांना हाडांचा पीक वाढविण्यास चांगला उपयोग झाला असा अनुभव आहे. जांभ्या खडकापासून होणाऱ्या जमिनीवर हाडांचा विशेषच उपयोग होतो. हाडाशिवाय फास्फेटस् नांवाचीं द्रव्यें कांहीं ठिकाणीं मिळतात त्याचाही उपयोग खतांत करतात परंतु महाराष्ट्रांत मृत जनावरांचीं हाडें रानोमाळ पसरलेलीं आढळतात. हीं गोळा करून त्यांचा खताकडे उपयोग करावा. हाडांचे लिंबाचेपेक्षा किंवा बोरापेक्षा मोठाले तुकडे जमिनींत घातल्यास ते जमिनींत मिसळून जात नाहींत. ते तुकडे ७८ वर्षे राहिल्यानंतर खणून पाहिल्यास मूळ स्थितींत होते तसेच सांपडतात. यामुळें कांहीं लोक असें म्हणतात कीं नुसतीं हाडें न वापरतां त्यावर सल्फ्युरिक आसिड टाकून त्या हाडांचें सुपरफास्फेट तयार करावें म्हणजे त्याच्यांत तयार झालेलें फास्फेट पाण्यांत विरघळणारें असतें तें झाडें शोषून घेऊं शकतील व त्याचा पिकांना, झाडांना वगैरे वनस्पतींना उपयोग होईल, हे खरें आहे. परंतु सुपरफास्फेट जमिनींत घातल्यावर थोडेच दिवसांत न विरघळणाऱ्या स्थितींत येते यामुळें सल्फ्युरिक आसिडकरतां लागणारा खर्च व एकंदरींत केलेली खटपट फारशी फायदेशीर पडत नाही. जांभ्या खडकाच्या जमिनींत तर सुपरफास्फेटच्या आम्लतेमुळें तें अपायकारक होतें. तेव्हां सुपरफास्फेट करणें फायदेशीर नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

फास्फेट जमिनींतून झाडांना घेतां येईल अशा स्थितींत असेल तरच उपयोगी असणार तेव्हां हाडें कशा प्रकारें जमिनींत घातल्यास झाडांना उपयोगी ठरतील हें आपणांस पाहिलें पाहिजे. आतांपर्यंतचा असा अनुभव आहे कीं, हाडें फोडून त्याची अगदी बारीक भुकटी केल्यास त्याचा जमिनांत उपयोग होतो कारण अशा स्थितींत झाडें हाडांतील फास्फेट शोषून घेऊं शकतात. पूड जितकी जास्त बारीक असेल तितकी ती जास्त उपयुक्त ठरते असा अनुभव आहे.

### हाडाची पूड

हाडांची भुकटी किंवा पूड करावयाची ठरल्यास ती कशा तऱ्हेनें करावी हा पुढला प्रश्न उपस्थित होतोच. हाडें चिवट असल्यानें फोडणें फार कठीण जातात, ती चपटी होतात परंतु त्यांचा भुगा करण्यासाठीं बऱ्याच मोठ्या यंत्राचा उपयोग करावा लागतो. या यंत्रांत मोठाले हातोडे असतात त्यांच्या तडाख्यानें मात्र हाडांचा चुरा होऊन तो जमिनींत घालण्यायोग्य असा होतो. ही यंत्रानें पूड करण्याची पद्धत धनाढ्य व्यापाऱ्यास शक्य आहे परंतु लहान गांवीं मध्यम वर्गाच्या माणसास अशी यंत्रसामुग्री उभारून हाडाचें खत करण्याचें जड आहे. ही अडचण दूर करावी म्हणून इंपेरियल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें १९३० सालीं असा ठराव केला कीं, हाडांचे सोप्या रीतीनें व थोड्या खर्चांत खत होणारी पद्धत शोधून काढण्याचा निरनिराळ्या प्रांतांतल्या शास्त्रीय लोकांनीं प्रयत्न करून एकादी उपयुक्त सूचना करावी. मुंबई प्रांतांतील शेतकीचे रसायन शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या पद्धतींचें संशोधन करून शेवटीं असें सिद्ध केलें कीं कोणत्याही रासायनिक क्रियेपेक्षा किंवा मोठ्या यंत्रानें हाडें फोडण्यापेक्षा ग्रामीण भागांत हाडांचें खत तयार करण्यास हाडें भाजून कुटणें सोपें व कमी खर्चाचें पडतें. ही पद्धत व इतर प्रांतांतून आलेल्या सूचनांचा विचार करून कौंसिलनें असें ठरविलें का मुंबई प्रांताची सूचना सर्वांत चांगली आहे व तिचाच प्रसार सर्व प्रांतांत करावा.

### इं. कौन्सिलनें पुरस्कारलेली पद्धत

इंपेरियल कौंसिलनें जी पद्धत पुरस्कारिली ती खालील प्रमाणें आहे. हाडें खेड्यांच्या आसपास व शहरांतून मसणवाट वगैरे सारख्या जागांवर सांपडतात. तीं गोळा करण्यास शेडचूल्ड वर्गाचे लोक तयार असतात. त्यांच्याकडून गोळा करून घेण्यास त्यांना योग्य वेतन दिल्यास हाडें मिळण्यास अडचण पडत नाहीं. हाडें गोळा झाल्यावर तीं भाजण्याकरतां लागणारें जळण घ्यावें. हें चांगलें वाळलेलें असावें. गवत, कडबा वगैरे कस्तण चालत नाहीं, कारण तें सर्पण हाडें पेट घेण्याचे आंत लवकरच जळून जातें. कापसाचे शेतांत शिल्लक राहिलेली झाडांची खराटी किंवा तुरीची तुराटी किंवा बाभळीच्या वाढलेल्या काटेरी खांद्या घेऊन त्यांचा जमिनीवर सहा ते आठ इंच उंचीचा एक चवकोन करावा. त्यावर हाडांचा सहा इंची थर घालावा. त्यावर दुसरा जळणाचा थर व त्यावर पुन्हा हाडांचा थर व अगदी वर पुन्हा जळणाचा थर असे जळणाचे तीन थर व त्यामध्यें हाडांचे दोन थर असे एकावर एक पांच थर करावे. ज्या बाजूनें वारा येत असेल त्या बाजूनें थर पेटवावा म्हणजे लवकरच सर्व थर पेट घेतात व हाडें पेटतात. एकदा हाडांनीं पेट घेतला म्हणजे अर्ध्या पाऊण तासांत सर्व ढीग पेटून हाडें भाजून निघतात. कित्यकांची राख होते परंतु बहुतेक भाजून त्यांचा कोळसा होतो. हाडें कशीहि भाजली गेलीं तरी हरकत नाहीं; कच्चीं किंवा दमट राहूं नयेत म्हणजे झालें. अशा प्रकारें हाडें भाजण्यास हाडांच्या वजनाच्या एक अष्टमांश वजन जळण लागतें. प्रत्येक १०० शेर वजनाचीं हाडें भाजण्यास साडे बारा शेर जळण लागतें.

वरील पद्धतीनें भाजलेलीं हाडें अगदीं ठिसूळ होतात व त्याचा भुगा केवळ हातानें चुरगळल्यास होतो. मोठ्या प्रमाणांत भुगा करणें झाल्यास भाजलेलीं हाडें चुन्याच्या घाणींत घालावीत व त्यावरून दहा बारा वेळां घाणीचें चाक फिरवावें म्हणजे हवा

( २५७ वरून चालू )

तसा भुगा तयार करतां येतो. त्यांतूनही न फुटतां कांहीं हाडें राहिल्यास तीं घाणींत टाकून त्यावरून पुन्हा चाक फिरवावें. हाडें भाजण्यांत त्यांतला नायट्रोजन कमी होतो, त्याची भरपाई करण्याकरतां त्यांत थोडासा सल्फेट ऑफ आमोनिआ घालावा किंवा हाडांचा भुगा जनावरांच्या मूत्रांत भिजत घालून नंतर जमिनींत घालावा. प्रत्येक १०० शेर हाडांचे भुग्यांत दहा शेर सल्फेट घातल्यास सर्व प्रकारें चांगलेंच खत तयार होईल.

### आर्थिक विचार

आपणाला फास्फेटचाच विचार करतांना नायट्रोजनचा विचार केलाच पाहिजे असें नाहीं. परंतु जातां जातां त्या बाबतींतली शंका दूर करण्याकरतां वरील सूचना दिली आहे. आर्थिक दृष्टीने वर दिलेली पद्धत इतर पद्धतीपेक्षां पुष्कळच फायदेशीर आहे. १९३१–३२ सालीं खानदेशांत एक मोठ्या प्रमाणांत खाजगी शेतावर प्रयोग केला. त्यामध्यें दोन तीन टन हाडें भाजलीं व त्याचा भुगा केला तेव्हां हाडांचा भुगा २५ रुपये टन या भावानें पडला व त्याच मालकानें आंबरनाथचे गिरणींतला हाडाचा भुगा घेतला त्याला ता शेतावर जवळ जवळ १०० रुपये टन पडला. गिरणींतील भुगा करण्यास हाडें लांबलांबून आणण्यास खर्च येतो त्याच प्रमाणें तयार झालेला भुगा शेतावर पोहोंचतां करण्यास बराच खर्च येतो. याशिवाय प्रत्येक ठिकाणीं एजंटांचा नफा ही एक मोठी बाब असते. या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्यास किंमतींत असा फरक पडणें साहजिक आहे, असें म्हणावें लागतें.

नवीन वर सांगितलेल्या पद्धतींत एक महत्त्वाची गोष्ट आहे ती वाचकांच्या लक्षांत यावी म्हणून मुद्दाम सांगत आहे. हाडें किंवा त्यांचा भुगा मेलेल्या जनावरांपासून मिळतो. मेलेल्या जनावराला एकादा स्पर्शजन्य रोग असल्यास हाडांचा नुसता भुगा केल्यास तो रोग इतरांना बाधण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें हाडें किंवा हाडांचा भुगा साठवून ठेवल्यास त्याला दमट हवेंत घाण येऊं लागते. हाडें भाजून निघाल्यावर तीं दमट हवेंत घाण देत नाहींत व त्यांच्या रोगजंतूचें बीज नाहींसें झाल्यानें त्यांचेपासून रोगांचा फैलाव होण्याचा मुळीच संभव नाहीं. एकंदरींत, दिलेल्या पद्धतीनें हाडांची पूड केल्यास ती निरोगी, स्वच्छ व स्वस्त दरानें खेड्यांतील लोकांना सहज मिळवितां येईल.

### जागतिक अन्न पुरवठा

जगांतील कांहीं प्रमुख देशांतील लोक युद्धापूर्वीच्या मानानें आज किती अन्न खात आहेत, याविषयीं कांहीं आकडे खालीं दिले आहेत.

| देश | कॅलरी | युद्धापूर्वीशीं प्रमाण |
|---|---|---|
| अमेरिका | ३,१०० | १००% |
| कॅनडा | ३,००० | १०० |
| ऑस्ट्रेलिया | ३,००० | ९७ |
| ग्रेट ब्रिटन | २,८००–२८५० | ९३–९५ |
| डेन्मार्क, स्वीडन | २,८००–२,९०० | ९० |
| फ्रान्स, बेलजम, नेदरलंड्स, नॉर्वे | २३००–२५०० | ७८–८५ |
| 'अनरा' देश | १,७००–२,४०० | ६०–८५ |
| जर्मनी | १,६००–१,८०० | ५०–६० |


# शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.

## ठळकवाडी–बेळगांव

पैसे गुंतविण्यास योग्य स्थान
व ते गुंतविल्यानंतर योग्य समाधान

आपले पैसे भरपूर व्याजानें अत्यंत सुरक्षिततेनें आमचेच कारखान्यांत ठेवींच्या रुपानें गुंतवून वरील दोन्हीं गोष्टी आपणांस साधतां येतील.

( १ ) गेल्या पांच वर्षांत कंपनीस खालीलप्रमाणें सर्वसाधारण नफा मिळालेला आहे.

| १९४१ | १९४२ | १९४३ | १९४४ | १९४५ |
|---|---|---|---|---|
| रु. २९६१–१५–० | रु. २३७४–६–६ | रु. १४,११४–१४–११ | रु. १९,६२२–२–२ | रु. २०,४३८–१५–२ |

( २ ) कंपनीनें अत्यंत हालअपेष्टा सोसूनही गेल्या ५।६ वर्षांत जी अभिनंदनीय प्रगती केली त्याबद्दल व कंपनीच्या एकंदर कार्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब सांगली, दे. भ. न. चिं. केळकर, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रा. ग. त्र्यं. माडखोलकर, मुंबई इलाख्याचे भूतपूर्व गव्हर्नर मि. एच्. एफ् नाईट, के. ने. ना. श्रीनिवास शास्त्री, बेळगांव जिल्ह्याचे माजी कलेक्टर मि. शील्डस वगैरे प्रसिद्ध व्यक्तींनीं धन्योद्गार काढलेले आहेत.

( ३ ) कंपनीनें नवीन काढलेले शटल्स, डुप्लिकेटस व बिडाच्या वस्तु यांना फारच मोठ्या प्रमाणांत मागणी येत असून अवघ्या दोन महिन्यांत कंपनीनें जवळजवळ रु. ५,००,००० च्या ऑर्डर्स स्वीकारल्या आहेत.

कंपनीच्या वाढत्या उत्पादनाच्या दृष्टीनें जास्त भांडवलाची जरूर असून त्याकरतां कंपनीनें सढळ अटीवर ठेवी घेण्याचें ठरविलें आहे. व्याजाच्या दराकरतां व इतर माहितीकरतां आजच लिहाः—

दि शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.

ठळकवाडी–बेळगांव

# सहकारी चळवळ आणि शेतीची पुनर्घटना

लेखकः—प्रो. स. वा. कोगेकर, बी. ए. [ मुं. ]; बी. एस्सी. ( अर्थ. ) [ लंडन ]

दारिद्र्य आणि सतत वाढणारा कर्जाचा बोजा या दोन आपत्तींतून शेतकऱ्याची मुक्तता करण्याचा मार्ग म्हणून सरकारी प्रोत्साहनानें सहकारी चळवळीचा प्रसार करण्यांत आला. १९०४ सालीं जेव्हां सहकारी संस्थांसंबंधीं पहिला कायदा करण्यांत आला त्यावेळीं सरकारच्या डोळ्यांपुढें मुख्यतः शेतकऱ्याच्या मानेभोंवतीं बसलेले सावकारी पाश क्रमाक्रमानें तोडण्याचा उद्देश होता. सावकाराच्या कार्चातून शेतकऱ्यास सोडवावयाचें म्हणजे प्रथमतः सावकाराचे ऐवजीं कर्जे देणारी दुसरी संस्था निर्माण केली पाहिजे आणि त्या संस्थेमार्फत माफक दरानें कर्जे देऊन शेतकऱ्याच्या कर्जाच्या गरजा भागविल्या पाहिजेत, त्यावरील पूर्वापार कर्जाचा बोजा हलका केला पाहिजे आणि शेतीचा धंदा सुधारण्यास त्यास उत्तेजन दिलें पाहिजे अशा विचारानें सहकारी संस्थांची योजना सरकारनें केली. या चळवळीस प्रारंभ करण्यापूर्वी सरकारनें शेतकऱ्यास अडचणीचे प्रसंगीं आपल्या तिजोरींतून कर्जे देण्याचा प्रयोग करून पाहिला. परंतु शेतकऱ्यांच्या जीवनांत अडचणींचे प्रसंग दररोजचे असल्यामुळें त्यास लागणाऱ्या आर्थिक मदतीचें प्रमाण इतकें मोठें होतें कीं सरकारला तें सर्वस्वी आपल्या अंगावर घेतां आलें नाहीं. उलट सावकाराकडून काढलेल्या कर्जावरील व्याजाचे दर इतके जबरदस्त असत व शेतकऱ्याच्या नडीचा, अज्ञानाचा आणि निरक्षरतेचा फायदा घेऊन ते इतक्या हिकमती लढवीत कीं व्याज कसेंबसें परत दिलें तरी मूळ रक्कम परत देणें शेतकऱ्यास जवळ जवळ अशक्य होई. त्यामुळें कर्जाचा डोंगर सारखा वाढीस लागला आणि शेतकऱ्याचें दारिद्र्यही कमी होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां सरकारनें सहकारी चळवळीचा पुरस्कार केला.

### सहकारी पतपेढ्यांची स्थापना

जमिनीच्या लहान लहान तुकड्यांवर, वैयक्तिक जबाबदारीवर परंपरागत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना परस्पर सहाय्याच्या तत्त्वावर एकत्र येऊन आपल्या आर्थिक गरजा काटकसरीनें भागविणें श्रेयस्करच होतें. व्यक्तिशः प्रत्येक शेतकऱ्याची पत जरी फारशी नसली तरी सामुदायिक रीत्या ती पुष्कळच होती आणि तिच्या जोरावर शेतकऱ्यांस माफक दरानें कर्जे मिळणें अवघडही नव्हतें आणि अशा तऱ्हेनें सुरवातीस कर्जाकरितां एकत्र आलेल्या शेतकऱ्यांनीं आपल्या एकीचा उपयोग मालाची खरेदी, विक्री, जमिनीची सुधारणा इत्यादि अन्य बाबतींत केल्यास त्यापासून सर्वांचेंच हित होणार होतें. त्यामुळें सहकारी पतपेढ्यांची स्थापना करण्याचा जो निर्णय १९०४ सालीं घेण्यांत आला त्याचें स्वागत होणें योग्यच होतें.

परंतु गेल्या ४२ वर्षांत सहकारी चळवळीचा जो प्रसार या देशांत झाला त्यामुळें शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितींत फारसा फरक पडला आहे असें म्हणवत नाहीं. खासगी सावकारी अजून नाहींशी झाली नाहीं, व्याजाचे दर म्हणावेत तितके उतरले नाहींत, शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा आहे तसाच आहे, जमिनीची सुधारणा होण्याऐवजीं ती अधिकच निकृष्टावस्थेस पोहोंचली आहे. शेतीची पद्धति पूर्वपरंपरेप्रमाणेंच अजूनही आहे, शेतकऱ्यांच्या उत्पादनशक्तींतही फारसा फरक पडलेला नाहीं आणि वाढत्या लोकसंख्येमुळें दारिद्र्याचा प्रश्न अधिकच भेसूरपणें आपणापुढें उभा आहे.

### आर्थिक स्थिति कां सुधारली नाहीं ?

यावरून तीन अनुमानें बांधतां येतील. एक म्हणजे असें कीं, सहकारी चळवळ आपल्या शेतकऱ्याचा प्रश्न सोडविण्यास पूर्णपणें असमर्थ आहे. दुसरें असें कीं, या चळवळीचा प्रसार पुरेसा झाला नाहीं आणि त्यामुळें शेती व शेतकरी जीवन यावर तिचा प्रभाव पडूं शकला नाहीं आणि तिसरें असें कीं, ज्या मार्गानें सहकारी चळवळीचा प्रसार झाला तो मार्ग तितकासा योग्य नव्हता, व योग्य मार्गानें गेल्यास अजूनही सहकारी चळवळीच्या द्वारें शेतकऱ्याचा प्रश्न सोडवितां येईल.

यांपैकीं पहिलें अनुमान पटण्यासारखें नाहीं. कारण, गेल्या शंभर वर्षांत झालेल्या जगांतील निरनिराळ्या देशांतील प्रयोगांवरून सहकारी चळवळीच्या सामर्थ्याबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, डेन्मार्क, फ्रान्स, रशिया इत्यादि पाश्चिमात्य देश तसेच चीनसारखे पौर्वात्य देश यांनीं सहकारी तत्त्वावर उत्पादन, खरेदी-विक्री इत्यादि व्यवहार कार्यक्षमतेनें पार पाडतां येतात हें सिद्ध करून दाखविलें आहे. ज्या त्या देशांतील परिस्थितीप्रमाणें सहकारी चळवळीस योग्य तें विशिष्ट वळण मिळाल्यास तिच्या द्वारां आर्थिक उन्नति करतां आली पाहिजे आणि हिंदुस्थानच या नियमास अपवाद ठरूं शकत नाहीं. जगांतील सर्व आर्थिक व्यवहार परस्पर सहाय्यावर आधारलेले असतात व त्याच तत्त्वावर बसविलेली कार्यपद्धति अयशस्वी ठरेल हें संभवत नाहीं. तेव्हां आपण दुसऱ्या अनुमानाकडे वळूं.

आपल्या देशांतील सहकारी चळवळीचा प्रसार अपुरा आहे काय? या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी कांहीं गोष्टींचा खुलासा केला पाहिजे. १९४२–४३ सालीं आपल्या देशांत ९१,१४६ इतक्या शेतकऱ्यांच्या पतपेढ्या होत्या, आणि एकंदर सर्व प्रकारच्या ग्रामीण सहकारी संस्थांमध्यें त्यांचें प्रमाण शेंकडा ८५ इतकें होतें. त्यांच्या सभासदांची संख्या ३४ लक्ष, ६० हजार असून एकूण लोकसंख्येशीं हें प्रमाण शेंकडा १ च्या थोडें वर पडतें. सभासदांच्या कुटुंबांतील माणसांचाही सभासदांत समावेश केल्यास हें प्रमाण शेंकडा ५·१ इतकें होतें. १९४२-४३ या सालीं या संस्थांनीं एकंदर ४८ कोटी रुपयांचें कर्ज शेतकरी वर्गास दिलें. वर्षाच्या शेवटीं त्यांचें येणें १५८ कोटी रुपये असून त्यांपैकीं निम्म्याची परतफेडीची मुदत पूर्वीच संपून गेली होती. हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांचें एकंदर कर्ज १२ शें ते १५ शें कोटी रुपयांचें असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. त्याशीं तुलना करतां सहकारी संस्थांनीं दिलेलें कर्ज एकूण कर्जाच्या शेंकडा १० ते १२ टक्के इतकेंच होतें. बाकीचें कर्ज कांहीं पूर्वापार चालत आलेलें व कांहीं नवीन हें सावकाराकडून काढलेलें आहे. तेव्हां सावकाराशिवाय आज शेतकऱ्याचें चालूं शकणार नाहीं हें उघड आहे. जर सहकारी चळवळीचा प्रसार पुरेसा झाला असता तर सावकाराकडून कर्जे घेण्याची आवश्यकता उरली नसती. तेव्हां सहकारी चळवळ यशस्वी झाली नाहीं याचें कारण तिचा प्रसार पुरेसा झाला नाहीं असें आपणांस वाटतें.

पण जरा खोल विचार केल्यास आपणास असें दिसून येईल कीं, शेतकऱ्यास माफक दरानें कर्जे देण्यामागें जो मुख्य हेतु होता तो साध्य होण्याचे दृष्टीनें सध्यांच्या सहकारी संस्थांनीं देखील फारशी प्रगति केलेली नाहीं. वर दिलेल्या आकड्यांवरून आपल्याला असें दिसतें कीं एकूण येण्यापैकीं निम्मे येणें मुदत

उलटून गेल्यावर देखील शेतकऱ्यांकडे बाकी राहिलेलें आहे. याचाच अर्थ असा कीं, माफक दरानें मिळालेलें कर्ज देखील योग्य वेळीं परत करण्याची शक्ति शेतकऱ्यांचे अंगीं नाहीं. कारण त्याचा धंदा बुडींत चालतो. मिळालेल्या कर्जातून जमिनीची सुधारणा करून उत्पादनशक्ति वाढविण्यापेक्षां त्याचा उपयोग आपल्या दैनंदिन निर्वाहाकडेच त्याला करावा लागतो, आणि ही परिस्थिति जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत माफक दरानें कर्जे दिल्यानें आणि त्यासाठी सहकारी संस्थांची वाढ करण्यानें शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार नाहीं हें स्पष्ट आहे. सावकारास देणें असलेला कर्जाचा डोंगर सहकारी संस्थांच्या डोक्यावर बसला तर त्यामुळें दारिद्र्याचा प्रश्न सुटणें अशक्य आहे आणि सहकारी संस्थांची वाढ अपुरी आहे असें म्हणून त्यांचा याच पद्धतीनें आणखी प्रसार करणें म्हणजे बरोबर हीच गोष्ट घडवून आणण्यासारखें आहे. यांतून मार्ग काढण्यासाठी सहकारी चळवळीचा पायाच अधिक मजबूत करावयास पाहिजे.

### उत्पादन शक्ति वाढली नाहीं

त्या दृष्टीनें तिसऱ्या अनुमानाचा विचार करूं. आजपर्यंत सहकारी चळवळ कोणत्या पायावर उभारली गेली होती? याचें उत्तर असें आहे कीं, लहान प्रमाणावर शेती करणारा शेतकरी वैयक्तिक जबाबदारीवर व आपल्या परंपरागत अनुभवावर दै पद्धतीवर अवलंबून राहून आपला धंदा करणार ही गोष्ट सहकारी चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं निर्विवाद मान्य केली होती. शेतीसाठी लागणारें बीं-बियाणें, इतर अवजारें व बैल यांची खरेदी सहकारी तत्त्वावर करावी; शेतमालाची विक्री तशीच सामुदायिक रीत्या करावी; नित्य लागणारी आर्थिक मदत तशीच मिळवावी;—पण मुख्य जो शेतीचा धंदा तो प्रत्येकानें स्वतःच्या जबाबदारीवर व आपल्या जमिनींतील विशिष्ट हक्काप्रमाणें करावा अशी आजपर्यंत सहकारी चळवळीच्या पुरस्कर्त्यांची भूमिका होती. वैयक्तिक शेतीच्या मर्यादा संभाळून जी कर्जाची मदत पाहिजे असेल ती करण्यासाठी सहकारी संस्था झटत होत्या. एकाच मालकाची जमीन अनेक ठिकाणीं विभागली गेली असल्यास सहकारी संस्थांमार्फत निरनिराळ्या तुकडे-मालकांस एक सलग व संयुक्त जमिनीचा पट्टा मिळावा असें सुचविण्या इतपत जास्तींत जास्त मजल सहकारी कार्यकर्त्यांची गेलेली होती. पण त्यामुळें लहान प्रमाणावर चालणाऱ्या शेतीच्या पद्धतींत विशेष मूलभूत फरक पडणार नसल्यानें सहकारी चळवळीच्या प्रसारानें शेतकऱ्याच्या उत्पादनशक्तीचा प्रश्न तसाच राहिला आणि दैनंदिन निर्वाहासाठी कर्जे काढण्याची आवश्यकताही पूर्वीइतकीच तीव्र राहिली. सावकारांकडून काढलेलीं कर्जे ज्याप्रमाणें वाढत होतीं तशींच सहकारी संस्थांकडून घेतलेलीं कर्जेही वाढूं लागलीं आणि परतफेडीची शक्यता नसल्यामुळें कित्येक सहकारी संस्थांचें दिवाळेंहि काढावें लागलें. या परिस्थितींत चालू पद्धतीनेंच सहकारी संस्थांचा प्रसार करण्यापासून कांहीं फायदा होईल असें दिसत नाहीं.

### सहकारी तत्त्वावर सामुदायिक शेतीचा प्रयोग

म्हणून शेतीच्या उत्पादनाकडे सहकारी संस्थांनीं यापुढें जास्त लक्ष दिलें पाहिजे. वैयक्तिक रीत्या शेती करण्याऐवजीं सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन सामुदायिक, मोठ्या प्रमाणावर शेती करण्याची पद्धत स्वीकारल्यास शेतीचा धंदा अधिक किफायतशीर होईल असें तज्ज्ञांचें मत आहे. या पद्धतीनेंच अद्यावत् शास्त्रीय शोधांचा आणि अवजारांचा उपयोग करून शेतीचा धंदा जास्तींत जास्त किफायतशीर करतां येईल. या पद्धतींत मालकी हक्कांसही बाध येणार नाहीं व वाढणाऱ्या उत्पादनशक्तींत सर्वांस भागीदारी मिळूं शकेल. शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढल्यानेंच त्यांचें राहणीचें मान वाढूं शकेल आणि आजवरच्या दारिद्र्यास रामराम ठोकतां येईल. अर्थात् शेतीचें उत्पादन वाढविणें म्हणजे वाटेल तो माल वाटेल तितका उत्पादन करणें नव्हे. तर देशाच्या गरजा लक्षांत घेऊन सरकारच्या नेतृत्वाखालीं काम करणाऱ्या मध्यवर्ती संस्थेमार्फत निरनिराळ्या शेतमालाच्या उत्पादनाचें नियंत्रण करणें, आणि शेतीचा धंदा व इतर उद्योगधंदे यांची प्रमाणबद्ध रचना करणें होय. हें नियोजन यशस्वी करण्यांत लहान लहान शेतांवर काम करणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांपेक्षा मोठ्या प्रमाणावर सहकारी शेती करणाऱ्या कार्यक्षम शेतकऱ्यांचा उपयोग अधिक होईल.

आजपर्यंत झालेल्या सहकारी चळवळीच्या प्रसाराची दिशा आणि वर दिग्दर्शित केलेली दिशा यांत पुष्कळच फरक आहे हें नाकबूल करतां येणार नाहीं. कारण आजपर्यंत शेतकऱ्यांच्या स्वेच्छेवर सहकारी संस्थांची वाढ अवलंबून होती. सामुदायिक शेतीच्या पद्धति स्वीकारल्यास हरेक बाबतींत शेतकऱ्यांस आपलें वैयक्तिक मत बाजूस ठेवून सहकारी नियंत्रणाप्रमाणें शेतीचा धंदा करावा लागेल. पण तसें करण्यांत त्यांचें हित आहे असें दिसून आल्यास स्वखुषीनें शेतकरी वर्ग या पद्धतीशीं समरस होईल असें वाटतें. पण त्यापूर्वी आपल्या सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांचे व सरकारचे विचार या दृष्टीनें पुढें गेले पाहिजेत. शेतकऱ्यांची आर्थिक उन्नति केवळ स्वस्त व्याजाचीं कर्जे मिळण्यानें होणार नसून शेतीचें उत्पादन वाढल्यानेंच होऊं शकेल आणि तसें करण्याचे मार्गांत लहान प्रमाणावरील वैयक्तिक शेतीची पद्धति ही सर्वांत मोठी अडचण आहे, ही गोष्ट त्यांस पूर्णत्वानें पटली पाहिजे.

---


# कृष्णा शुगर मिल्स लि.,

## कृष्णा–कित्तूर

–संचालक मंडळ–

रा. ब. व्ही. व्ही. यारगोप, B A., LL. B., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी व्ही. गद्रे, B. A., LL. B., डिस्ट्रिक्ट जज्ज, बुधगांव; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमुरी; दिवाण बहादूर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी. मराठे, पुणें; श्री. बी. बी. पोतदार, B. A., LL. B., बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, पुणें.

## ठराविक मुदतीच्या ठेवी घेतल्या जातात.

ऑर्डिनरी शेअर्स सर्व विक्री झाले।

६ टक्के क्यु. प्रेफरन्स शेअर्स रु. २,००,००० किमतीचे विकणें आहेत. विशेष माहितीसाठीं लिहा.

| कृष्णा–कित्तूर<br>जिल्हा बेळगांव. | विंचूरकर आणि कंपनी,<br>मॅनेजिंग एजंटस्. |
|---|---|

अधिक माहितीः—रा. डी. एच. बेडेकर, सरदार विंचूरकरांचा वाडा, सदाशिव पेठ, पुणें २ यांचेकडून मिळेल.

# बँकिंग कंपन्यांसंबंधीं नियोजित कायदा

## कांहीं महत्त्वाच्या कलमांचा परामर्श

लेखक:—श्री. चिं. वि. जोग, बी. कॉम., सर्टि. ए. आय. आय. बी., सी. ए. आय. बी.

गेल्या पांच सहा वर्षांत बँकांची जी वाढ झाली व त्यांच्या व्यवसायाला ज्या नवीन नवीन वाटा फुटल्या, त्या लक्षांत घेतां बँकांच्या विषयीं एक स्वतंत्र कायदा असावा याबद्दल फारसें दुमत राहिलेलें नाहीं. बँकांच्या व्यवहारासंबंधीं जीं तत्त्वें अनुभवसिद्ध व शाश्वत म्हणून गणलीं गेलीं त्या तत्त्वांवरच अशा कोणत्याही कायद्याचें स्वरूप आधारलेलें असलें पाहिजे हें उघड आहे. मध्यवर्ती विधिमंडळापुढें जो कायदा आतां विचाराकरितां आहे, त्याची उभारणी कांहीं भाग सोडल्यास या तत्त्वांवरच झाली आहे हें मान्य करावें लागेल.

### हिंदी, संस्थानी व ब्रिटिश बँका

विशेष तपशिलांत न शिरतां बिलांतील ठळक गोष्टींचा विचार करावयाचा म्हटल्यास, पहिली गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं, इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या बँकांना एक विशेष स्थान या कायद्यांत मिळालेलें आहे. या उलट, हिंदी संस्थानांत स्थापन झालेल्या बँकांना इतर परराष्ट्रीय बँकांच्या बरोबर मानण्यांत आलें आहे. आर्थिक दृष्ट्या संस्थानें हे हिंदुस्थानचेच अविभाज्य घटक मानण्यांत येतात व हिंदुस्थानच्या कोणत्याही आर्थिक नियोजनांत हिंदी संस्थानांचा समावेश करण्यांत येतो. जीं संस्थानें या कायद्याप्रमाणेंच कायदे आपल्या संस्थानांत लागू करतील त्या संस्थानांतील बँकांना तरी ब्रिटिश हिंदुस्थानांत सवलती मिळावयास पाहिजेत. त्याचप्रमाणें ब्रिटिश बँकांच्यावरही इतर परदेशी बँकांच्या प्रमाणेंच बंधनें असावयास पाहिजेत.

### रिझर्व्ह बँकेचे व्यापक अधिकार

रिझर्व्ह बँकेला दिवसेंदिवस बरेंच महत्त्व प्राप्त होत आहे. या कायद्यानें तें आणखी वाढणार आहे. कोणत्याही बँकेला यापुढें धंदा सुरू करण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेकडून लायसेन्स मिळवावा लागेल परंतु सध्यां धंदा करीत असलेल्या बँकांना पांच वर्षेपर्यंत असे लायसेन्स काढण्याची जरूर नाहीं. हा कायदा अमलांत येण्याच्या वेळीं ज्या बँका "शिड्यूल्ड बँका" आहेत, त्यांच्यावरहि लायसेन्स काढण्याचें बंधन नाहीं. कायदा अमलांत आल्यानंतर ज्या बँका शिड्यूलमध्यें दाखल होतील त्यांच्यासंबंधीं या बाबतींत कांहीं खुलासा या बिलांत नाहीं. असें लायसेन्स देण्यापूर्वी त्या बँकेची व्यवस्था योग्य प्रकारें चालली आहे किंवा नाहीं, ती बँक आपल्या ठेवीदारांना पैसे वेळेवर देऊं शकेल किंवा नाहीं वगैरे संबंधींची खात्री रिझर्व्ह बँकेनें करून घेतली पाहिजे. तसेंच ज्याप्रमाणें लायसेन्स देण्याचा अधिकार आहे त्याप्रमाणें तें काढून घेण्यासाठी अधिकार रिझर्व्ह बँकेकडे आहे. एकाद्या बँकेचे व्यवहार योग्य तऱ्हेनें चालले नसले तर मध्यवर्ती सरकार सांगेल तेव्हां कोणत्याही बँकेची तपासणी करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस देण्यांत आला आहे. हा अधिकार फार काळजीपूर्वक वापरला पाहिजे. कारण अशी तपासणी आली असतां लोकांचा गैरसमज होऊन एकादी बँक चांगली चालत असून सुद्धां धोक्यांत येण्याचा संभव आहे. अशी तपासणी ही एक नित्याची बाब म्हणूनच गणली गेली पाहिजे. मग रिझर्व्ह बँक केव्हांही तिच्या सोयीप्रमाणें ती तपासणी करो! त्याचप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे वेळोवेळ बँकांनीं आपली माहिती—पत्रकें (रिझर्व्ह फंड, कॅश रिझर्व्ह, बॅलन्स शीट, वगैरे संबंधींचीं) पाठवावयाचीं आहेत. दहा वर्षेपर्यंत ज्या खात्यावर कोणताही व्यवहार झाला नाहीं अशा खात्यांची माहिती दर वर्षीं रिझर्व्ह बँकेकडे पाठवावी लागेल. त्याशिवाय आणखी कांहींही माहिती लागल्यास ती मागविण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला देण्यांत आला आहे. अशी माहिती जरूर वाटल्यास रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध करावी.

### बँकांचे व्यवसाय

बँकांनीं कोणकोणते व्यवसाय करावेत यांची मर्यादा या कायद्यानें विस्तारानें ठरविण्यांत आली आहे. परंतु सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् वगैरे सारखे व्यवसाय जे हल्लीं बऱ्याच बँका करतात त्याबद्दल निश्चित असें धोरण दिसत नाहीं. ज्या कंपन्यांचे उद्देश या कायद्यानें ठरविलेल्या बँकांच्या धंद्यांच्या कक्षेत येतात अशाच कंपन्या सबासिडिअरी कंपन्या म्हणून काढण्याची मुभा आहे. कोणत्याही एका कंपनीच्या शेअर्सवर कर्ज म्हणून, किंवा स्वत: मालकी हक्कानें बँकेच्या वसूल भांडवल व रिझर्व्ह फंड यांच्या वीस टक्के किंवा त्या कंपनीच्या भांडवलाच्या वीस टक्के यांपैकीं जी रक्कम लहान असेल इतकेंच कर्ज देतां येईल किंवा इतकेच शेअर्स आपल्या नांवें धारण करतां येतील. कर्जापोटीं बँकांकडे आलेली मिळकत (स्थावर, जंगम, कारखाने वगैरे) यांची त्यांनीं ती मिळकत मिळाल्यापासून किंवा कायदा अंमलांत आल्यापासून सात वर्षांच्या आंत विल्हेवाट लाविली पाहिजे. तसेंच, बँकांना यापुढें कोणत्याही प्रकारें व कोणत्याही प्रकारच्या व्यापारांत भाग घेतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें डायरेक्टरांना किंवा त्यांचे संबंध असलेल्या कंपन्या, पेढ्या वगैरेंना तारण घेतल्याशिवाय कर्ज देतां येणार नाहीं.

### धंद्यावर कमिशन बंद

यापुढें बँकिंग कंपन्यांना आपला कारभार पाहण्याकरितां मॅनेजिंग एजंटस नेमतां येणार नाहींत. मॅनेजर किंवा मॅनेजिंग डायरेक्टर यांना धंद्यावर कमिशन किंवा नफ्यामध्यें वांटा वगैरे देतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर यांची नेमणूक लांब मुदतीची न करतां, एका वेळेस पांच वर्षांपर्यंत करतां येईल. परंतु पांच वर्षांनीं त्यांची फेरनेमणूक होऊं शकेल.

### भांडवलासंबंधीं नियम

बँकांच्या भांडवलासंबंधीं जे नियम करण्यांत आले आहेत, ते कोणत्या एका विशिष्ट तत्त्वावर आधारलेले आहेत असें वाटत नाहीं. हिंदुस्थानांत कोठेंही धंदा करावयाची मुभा हवी असल्यास भांडवल व रिझर्व्ह फंड मिळून वीस लक्ष रुपये असलें पाहिजे व कोणतीही नवीन बँक सुरू करण्यापूर्वी कमींत कमी एक लक्ष रुपये वसूल भांडवल असलें पाहिजे. हें भांडवल वरील प्रमाणें आहे किंवा नाहीं हें ठरवितांना ताळेबंदांत भांडवल म्हणून दाखविण्यांत येणारी रक्कम मान्य करण्यांत येईलच असें नाहीं. त्या भांडवलाची किंमत म्हणजे बँकेच्या जिंदगीची बाजारची किंमत त्यांतून बँकेचें देणें वजा जातां जी रक्कम राहील ती होय.

# महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांचा प्रश्न

ले.:—श्री. बळवंत पांडुरंग पेंडसे, बी. ए. ( ऑनर्स ), बी. कॉम., सर्टि. ए. आय. आय. बी.

भाषावार प्रांतरचना व युद्धोत्तर पुनर्घटना यामुळें महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांचे प्रश्नाला अलिकडे बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. तरी महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या प्रश्नाचें दिग्दर्शन या लेखांत करण्याचें योजलें आहे. या लेखांत फक्त मुंबई प्रांतांतील महाराष्ट्राचा विचार केलेला आहे. महाराष्ट्रांत खालील जिल्ह्यांचा समावेश होतो. ( १ ) मुंबई बेट ( २ ) पूर्व खानदेश ( ३ ) पश्चिम खानदेश ( ४ ) नाशिक ( ५ ) अहमदनगर ( ६ ) पुणें ( ७ ) सोलापूर ( ८ ) सातारा ( ९ ) ठाणें ( १० ) कुलाबा ( ११ ) रत्नागिरी आणि ( १२ ) बेळगांव. महाराष्ट्र प्रांत बंगाल किंवा संयुक्त प्रांत इतका उद्योगधंद्यांत पुढें गेलेला नाहीं. याचें कारण उघडच आहे. महाराष्ट्रांत लोखंड व कोळसा यांच्या खाणी नसल्यामुळें उद्योगधंद्यांना आवश्यक असलेले हे मूलग्राहा महत्त्वाचे कारखाने महाराष्ट्रांत निघूं शकले नाहींत. तसेंच चहा, कॉफी, रबर यांसारख्या लागवडीचे कारखान्यांना महाराष्ट्रांतील जमीन अनुकूल नसल्यामुळें तसले कारखाने येथें होऊं शकले नाहींत. खाली दिलेल्या कोष्टकावरून महाराष्ट्रांतील कोणते जिल्हे कोणत्या धंद्याला अनुकूल आहेत हें दिसून येईल.

यापैकीं ( १ ) कापड ( २ ) कागद व ( ३ ) कातड्याचे जिन्नस हे महाराष्ट्रांतील कोणत्याही जिल्ह्यांत होऊं शकतील. महाराष्ट्रांतील कोणत्या जिल्ह्यांत कोणत्या धंद्यांस वाव आहे, हें खालील कोष्टकावरून समजेल.

१ मुंबई उपनगर—( १ ) इंजिनिअरिंग ( २ ) रसायन ( ३ ) कांच ( ४ ) साबू.

| १<br>धंदा | २<br>कच्चा माल | ३<br>महाराष्ट्रांतील अनुकूल जिल्हे | ४<br>हिंदुस्थानांतील अनुकूल असलेले इतर प्रांत |
|---|---|---|---|
| १ सुती कापड | कापूस | पूर्व व पश्चिम खानदेश | अहमदाबाद नागपूर |
| २ रेशमी कापड | रेशीम एका विशिष्ट किड्यापासून तयार होतें. ह्या किड्यांचें अन्न म्हणजे मलबेरी झाडाचीं पानें. तेव्हां हीं झाडें जेथें होतील तेथें रेशमाची पैदास चांगली होते. | बेळगांव | म्हैसूर |
| ३ लोकरी कापड | (१) मेंढ्यांस अनुकूल हवा (२) सुपीक कुरणें | पुणें जिल्हा | काश्मिर |
| ४ इंजिनिअरिंग कारखाने | (१) कोळशाचे किंवा लोखंडाचे खाणींचा अभाव. (२) परंतु इतर मोठ्या कारखान्यांचे जवळ या कारखान्यांची वाढ होऊं शकेल. | १ ठाणें जिल्हा<br>२ मुंबई उपनगर<br>३ सोलापूर | बंगाल व बिहार-लोखंड व कोळशाचे खाणीजवळ |
| ५ साखर | पाण्याचा पुष्कळ पुरवठा असलेल्या जागेंत ( विशेषतः इरिगेशन कालव्याखालील जमीन ) उंसाची लागवड होऊं शकेल. | १ पुणें जिल्हा<br>२ अहमदनगर जिल्हा. | सं. प्रांत बिहार |
| ६ काड्यांच्या पेट्या | भरपूर पाणीपुरवठा व जंगलें यांच्या सान्निध्यांत हे कारखाने होतील. | ठाणें पुणें सातारा बेळगांव | बंगाल मद्रास |
| ७ कागद | रद्दी, चिंध्या, बांबू व सवाई गवत यांपासून कागद तयार होतो. | कोणत्याही जिल्ह्यांत कागद होऊं शकेल. विशेषतः बांबूची लागवड असल्यास बरें. | सं. प्रांत बंगाल |
| ८ कातड्याचे जिन्नस | आवाराम साली जेथें होतात तेथें हा धंदा चांगला चालेल ( पूर्वी दक्षिण आफ्रिकेंतून येणाऱ्या वॅटलसाली उपयोगांत आणीत परंतु बहिष्काराचें शस्त्र उपसल्यापासून त्या साली येणें बंद झालें. ) | सर्व जिल्हे ( विशेषतः दक्षिणेकडील ) | मद्रास |
| ९ रासायनिक द्रव्यें | हे कारखाने दुसऱ्या कारखान्यापाशीं असणें जरूर आहे. यांना लागणारा कच्चा माल महाराष्ट्रांत उपलब्ध नाहीं. | मुंबई उपनगर ठाणे जिल्हा | काठेवाड म्हैसूर बडोदें बंगाल |
| १० कांच | सोडा अॅश व वाळू यांवर हे धंदे अवलंबून आहेत. | मुंबई उपनगर ठाणें जिल्हा पुणें | सं. प्रांत बंगाल |
| ११ सीमेंट | विशिष्ट प्रकारची वाळू व माती. | महाराष्ट्रांत या धंद्यास वाव नाहीं. | ओखा बंदर |
| १२ विद्युत शक्ति | कालव्यांवर विद्युच्छक्ति उत्पन्न करतां येईल. | भाटघर भंडारदरा पुणें नगर सोलापूर खानदेश | पंजाब मद्रास |

३ पुणें जिल्हा–( १ ) लोकर ( २ ) साखर ( ३ ) काड्याच्या पेट्या ( ४ ) कातड्याचे जिन्नस ( ५ ) कांच ( ६ ) विद्युच्छक्ति.

३ खानदेश–( १ ) कापड ( २ ) विद्युच्छक्ति.

४ बेळगांव व ५ सातारा– ( १ ) रेशीम ( २ ) काड्याच्या पेट्या ( ३ ) कातड्याचे जिन्नस.

६ सोलापूर–( १ ) इंजिनिअरिंग.

७ ठाणें–( १ ) इंजिनिअरिंग ( २ ) काड्याच्या पेट्या ( ३ ) रासायनिक द्रव्यें ( ४ ) कांच ( ५ )साबू.

८ नगर–( १ ) विद्युच्छक्ति ( २ ) साखर.

९ रत्नागिरी–( १ ) साबू.

१० कुलाबा–कांहीं नाहीं.

सर्व जिल्ह्यांमध्यें रत्नागिरी व कुलाबा हे जिल्हे उद्योगधंद्यांत मागासलेले आहेत. हे जिल्हे डोंगराळ प्रांतांत आहेत व येथें पर्जन्यवृष्टि पुष्कळच होते. तसेंच दळणवळणाचे मार्गही थोडे आहेत, रस्ते अपुरे आहेत व या जिल्ह्यांत रेल्वे जवळ जवळ नाहींच असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां या जिल्ह्यांमध्यें रेल्वे सुरू होणें अत्यंत निकडीचें आहे. दळणवळणाची साधनें वाढविण्याची आवश्यकता सरकारास पटलेली आहे आणि त्या संबंधांत कांहीं योजनाहि आखण्यांत आल्या होत्या. त्या बाबत पुनः चालना मिळणें जरूर आहे.

कच्च्या मालाच्या दृष्टीनें कोणते धंदे कोणत्या प्रांतांत होणें शक्य आहे याचें दिग्दर्शन वर केलें आहे. इतर दृष्टीनें कोणत्या भागांत कोणते धंदे होणें शक्य आहे याचा आपण आतां विचार करूं या. चढाओढीचा अभाव किंवा मक्तेदारी असली म्हणजे मग कच्चा माल जवळ नसला तरी कोणताही धंदा जोरांत चालू रहातो. मुंबई बेटांत किंवा जवळपास कापूस होत नसला तरी स्पर्धेच्या अभावामुळें कापडाचा धंदा जोरांत फोफावला. कांहीं कांहीं धंद्यांमध्यें कामगारांचें खर्चाचें प्रमाण जास्ती असते तेव्हां जेथें कामगारांची मजुरी स्वस्त असेल, तेथें ते धंदे स्थापणें फायद्याचें होतें. हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक सल्लागारांनीं " हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांचें प्रादेशीकरण " या नांवाचें एक चोपडें प्रसिद्ध केलें आहे. त्यांत निरनिराळ्या धंद्यांतील मजुरीचें प्रमाण खालीलप्रमाणें दिलें आहे.

| धंदा | शेंकडा टक्के मजुरीचें प्रमाण |
|---|---|
| माशिनरी | २८·७% |
| कापड | २५·७% |
| कातड्याचे जिन्नस | २३·६% |
| लोखंड | २२·३% |
| कागद | १८·१% |

महाराष्ट्रांत कोणत्या जिल्ह्यांत मजुरीचें प्रमाण कमी आहे व तेथें हे धंदे होतील किंवा नाहीं, याचें संशोधन झालें पाहिजे.

यानंतरचा प्रश्न म्हटला म्हणजे वाहतुकीचे खर्चाचा. वाहतुकीचे दरांत एकसूत्रीपणा असेल तर निरनिराळे उद्योगधंदे निरनिराळ्या भागांत काढणें सोयीचें पडेल. किनाऱ्याकडे माल आणण्याचे आगगाडीचे दर स्वस्त असल्यामुळें बहुतेक धंदे किनाऱ्याचे आसपास वसलेले आपणास आढळतात. यापुढील प्रश्न म्हटला म्हणजे बाजाराचे सान्निध्याचा. मालाचें उत्पादन झालें व जवळपास खपला म्हणजे वहातुकीचा खर्च कमी येतो. म्हणून वस्ती जेथें जास्त असेल तेथें निरनिराळे कारखाने उभारणें फायदेशीर असतें. याकरतां मोठमोठ्या वस्तीचीं गांवें रेल्वेनें कशीं जोडतां येतील याचा विचार झाला पाहिजे. तसेंच भुईभाडे व स्थानिक करांचें प्रमाण याचा कोणताही धंदा उभारते वेळीं आपणास विचार करणें जरूर आहे. मुंबईसारख्या ठिकाणीं या खर्चाचें प्रमाण जास्त असल्यामुळें नवीन धंदे मुंबई शहरांत न काढतां आसपासचे जिल्ह्यांमध्यें काढणें श्रेयस्कर होईल. पण कोणताही धंदा उभारतेवेळीं त्या प्रश्नाचा सर्व बाजूनें विचार करणें आवश्यक आहे.

उद्योगधंदे व शहरें यांचा परस्पर संबंध अतिशय निकटचा आहे. शहरांमध्यें माल खपतो. म्हणून शहराचे आसपास कारखाना उभारण्याकडे प्रवृत्ति होते. एकदां कारखाना उभारला म्हणजे त्यामध्यें काम करण्यास आसपासचे शहरांतून व खेड्यांतून लोक येऊन त्या शहराची वस्ती वाढते व ह्या वाढलेल्या वस्तीला आणखी जास्ती माल लागतो. म्हणून पूर्वीचा कारखाना वाढवणें किंवा तसलेच कारखाने काढणें याची आवश्यकता भासते.

कोणत्याही धंद्याचा कारखाना काढण्यापूर्वी त्यांचा स्थितिनिदर्शक काय आहे याचा विचार करणें आवश्यक आहे.

महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांचे कांहीं प्रश्नांचें केवळ दिग्दर्शन केलें आहे. त्या सर्व प्रश्नांचा खोल अभ्यास करून संशोधन करणें तज्ज्ञांचें काम आहे. अशी स्फूर्ति उद्योगधंदेवाल्यांना व तज्ज्ञांना मिळो, अशी इच्छा आहे.


## सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी लि. बँकर्स

स्थापना सन १९०७

संस्थापक व सुरवातीपासूनचे अध्यक्षः—श्री. वा. ग. चिरमुले

हेड ऑफिसः—सातारा शहर

—ः शाखा ः—

१ कराड, २ कराड स्टेशन ( ओगलेवाडी ), ३ मसूर

ता. ३०–६–१९४६ अखेरचे आंकडे

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... रु. | ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | ... ... रु. | २,३१,१७५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... ... रु. | ४४,००,००० |

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

द. के. जोगळेकर, मॅनेजर

## युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

स्थापना १९३६

हेड ऑफिस—सातारा

शाखा—मुंबई, पुणें, नासिक, बार्शी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | ... ... रु. | ४,९१,४७० |
| एकूण खेळतें भांडवल | ... ... रु. | ६५,००,००० |

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

ना. म. जोशी
सेक्रेटरी

# किं दूरम् व्यवसायिनाम्

लेखकः—श्री. दामोदर वामन पोतदार, बी. ई. ( मेक्. ), बी. ई. ( इलेक्. ), ए. एम्. आय. ई. ( इंडिया )

जागतिक युद्धामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितींत, आपणापुढें नवे नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत. गेल्या ५ वर्षांतील युद्धकाळांत शास्त्रीय ज्ञानाची वाढ इतकी जबरदस्त झपाट्यानें झाली आहे कीं तेवढी शांततेच्या काळांत एक शतकांतही झाली नसती. अर्थात् आमच्या पूर्वीच्या कल्पना व शास्त्रें या आधारें आतां व्यवहार होणार नसून नव्या कल्पना व नव्या शोधाचे अनुरोधानेंच ते होणार हें उघड आहे. काल व अंतर याबद्दलची आमची कल्पना व माहिती जुनी व बुरसटलेली ठरली आहे. एका तासांत ६,००० मैल वेगानें आकाशांत १६ टन वजनाचें रॉकेट १० मैल उंचावर फेकलें जात आहे. इंग्लंड–अमेरिकेचें अंतर दोन दिवसांचे अवधींत तोडलें जात असल्यामुळें ते देश आतां आपल्या अगदींच सान्निध्यांत आले आहेत. ते आमचे अगदीं शेजारीच झाले, यामुळें तिकडील चालीरीती व समाजाचे आचारविचार यांचा आमच्यावर पूर्वीपेक्षाही जबरदस्त आघात यापुढें होत जाणार यांत शंकाच नको! अशा वेळीं आम्हीं या बदलत्या परिस्थितीचा विचार करून त्या परिस्थितीला अनुरूप असे आमचे आचारविचार बदलले आहेत काय? नाहीं. असें जर खरें, तर स्पर्धेच्या जगांत आमची जागा मागची राहून इतर देश पुढें सरकणार. कानडा व आस्ट्रेलिया यांची युद्धकालीन प्रगति स्पृहणीय अशीच झाली आहे; त्या काळांतील संधीचा आम्हांस फायदा झाला नाहीं.

## सामाजिक कर्तव्याविषयीं जागरूकता

नुकतेच आपले देशांत पूर्णतः नसले तरी अंशतः आपले स्वतःचे सरकारास राजकीय अधिकार प्राप्त झाले आहेत, व त्यानुसार पं. जवाहरलालसारखे लोकप्रिय, उत्साही, धडाडीचे, व पूर्णत्वानें राष्ट्रीय विचाराचे असे जगद्विख्यात पुढारी त्या सरकारचे मुख्य मंत्री झाले. आजवर आपण अनेकवेळां "आमचा कारभार आम्ही करूं व तसा तो करण्यास आम्ही पूर्ण लायक आहोंत" असें लिहिलें व बोललों. पण प्रत्यक्ष वेळ आल्यावर परराष्ट्रांमध्यें, हिंदुस्थानचे हिताचे दृष्टीनें राजकीय संबंध जुळविण्यास व जोडण्यास आमचेपाशीं योग्य तशीं व तितकीं माणसें नाहींत असें म्हणण्याचा प्रसंग पंडितजींवर अगदीं महिना–पंधरा दिवसांतच यावा हें दुर्दैव आहे. एवढ्या मोठ्या ४० कोटि लोकसंख्येच्या देशांत या कामास लागणारीं व अनुरूप अशीं ३०० माणसें मिळत नाहींत ही गोष्ट व परिस्थिति चिंतनीय नाहीं असें कसें म्हणावें? हिंदुस्थान सरकारचे कामाचा व्याप मोठा व तो पेलणारांचें कसब व कर्तृत्वही मोठें. अशा कामाला माणसें मिळणें कठीण तर खरेंच पण एकदां काम पत्करल्यावर लायक, हुशार व कर्तृत्ववान् माणसें पुरविणें व कारभार राष्ट्र व लोकहितैषी दृष्टीनें चालविणें ही जबाबदारी राष्ट्रानें पार पाडलीच पाहिजे. ही परिस्थिति सहजासहजीं निर्माण होत नसते. त्याबद्दलची जागरूकता राष्ट्रांत खालपासून वरपर्यंत निरंतर असावी लागते व त्या अनुरोधानें आपला व्यवहार घडावा व वडवावा लागत असतो. अशी जागरूकता आमचे दुर्दैवानें आमच्यांत आज तरी नाहीं. इतकेंच नव्हे तर तशी ती असावयास हवी व ती आम्हांत नाहीं याची पूर्णत्वानें जाणीवही आम्हांस असल्याचें आम्हांस दिसत नाहीं. वरील विधानाचे पुष्ट्यर्थ आमच्या शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, धार्मिक व सामाजिक व्यवहाराकडे लक्ष दिलें तर त्या त्या सर्व क्षेत्रांत




—आमच्या—

असंख्य ग्राहकांस, एजंटांस व हितचिंतकांस

दिवाळी व नूतन वर्ष

आनंदाचें, सुखाचें व भरभराटीचें जावो.

मॅनेजिंग डायरेक्टर—

आयुर्वेदीय अर्कशाळा लि. सातारा



आमच्या पुढें कामाचे डोंगर पडले असतांही तीं तीं कामें करण्यास व त्याबद्दल नियोजन करण्यास क्षम व कर्तव्यरत कर्तृत्ववान् माणसें फार कमी आहेत असें जें दृश्य आहे तें दाखवितां येईल. प्रत्येक कार्यक्षेत्रांत काम करण्यासाठी विशिष्ट गुणधर्म व माहिती असावी लागते, असें असतांही तशी ती माहिती, अनुभव वा तसे ते गुणधर्म प्राप्त करून न घेतांही निरनिराळ्या क्षेत्रांत अनेक माणसें जागा अडकवून बसल्याचें दृश्य कोणाही समंजस व डोळस माणसाला स्वच्छ दिसेल. वर्तमानपत्रांतील प्रसिद्धी व मानाची जागा यासाठी समाजांतील सुशिक्षित, अशिक्षित, हौशी व महत्त्वाकांक्षी अशा व्यक्ती हपापलेल्या दिसतात. पण प्राप्त झालेल्या वा अंगावर पडलेल्या जबाबदारींतून यथायोग्य तऱ्हेनें पार पडतां येईल अशा गुणधर्मांची जोपासना करण्याची बुद्धि मात्र जागृत दिसत नाहीं. समाजांतील व्यवहारास प्रत्येक व्यक्तीचे मानानेंच हें वळण लागल्याशिवाय ही बुद्धि जागृत होत नाहीं. दैनंदिन व्यवहारामध्यें आमचे हातून प्रत्यही प्रमादच घडतात व तेही सहज व न कळत. उदाहरणार्थ, अगदीं साध्यासुध्या गोष्टीच घ्याना ! पोस्टाचे पाकिटावर उजव्या बाजूचे कोपऱ्यावर तिकीट न लावणें, केरकचऱ्यांतुन सेफ्टी रेझरचीं पातीं टाकून देणें, रस्त्यावर मधून वा चुकीचे बाजूनें चालणें, यासारखे रोज घडणारे प्रकार अगदी सहजासहजीं व सतत आमचेकडून घडतात, व तसे ते घडत असतांना आपल्या हातून कांहीं सामाजिक प्रमाद घडत असल्याची गंधवार्ताही नसते. या बाबतींत आमचें कांहीं कर्तव्य आहे व तें आम्ही करत नाहीं हा जेथें विचारच ठिकाणावर नाहीं, तेथें योग्य तो व समाजास इष्ट वळण व दर्जा प्राप्त करून देणारा, व्यवहार किंवा आचार आमचे हातून कसा घडणार ? तात्पर्य, अगदीं क्षुल्लक व साध्यासुध्या बाबीपासून जर आपण विचार केला तर अजून आम्हांस सामुदायिक जबाबदारीची व सामाजिक व राष्ट्रीय जीवनांतील व्यक्तीच्या कर्तव्याची जाणीवच उत्पन्न झाली नाहीं असें दिसून येतें. आमची गति ही अशी इतकी मागासलेली आहे व यामुळेंच आमच्या विचाराची दिशा नीट रहात नाहीं. विस्कळित व व्यक्तिप्रधान असा आमचा व्यवहार होतो व तो समाजास व राष्ट्रास पोषक व उपकारक होतोच असें नाहीं; क्वचित् प्रसंगीं तो तसा सहजरीत्या होतही असेल.

### लायक कार्यकर्त्यांचा पुरस्कार

परकी सत्ता जाऊन आमचा कारभार आम्ही करण्याचा काल आतां आहे व युद्धपरिस्थितीमुळें जागतिक परिस्थितींत फारच झपाट्यानें फरक पडला आहे व पडणार आहे. त्यामुळें आमच्यांतील दोषांचा विचार करून ते सत्वर काढून टाकल्याविना आपला निभाव लागणार नाहीं. लोकशाही तत्त्वाचा विजय झाल्यामुळें यापुढील आमचें सामाजिक व राष्ट्रीय जीवन त्या तत्त्वाप्रमाणेंच चालणार आहे, पण शिस्तीच्या व योग्य शिक्षणाच्या अभावीं आम्हांस त्याचीं फळें जशीं मिळावयास हवीं तशीं तीं मिळणार नाहींत अशी भीति वाटते. आमच्या स्थानिक–स्वराज्य संस्थांचा कारभार पाहिला म्हणजे या म्हणण्याची सत्यता पटेल. परस्पर सहकार्य व समानतेच्या पायावर स्वावलंबनाचा आश्रय करून सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या संस्थांचा व्यवहार पाहिला तरी तेथेंही निराशाजनक परिस्थिति दिसते. जातीय विचार, व्यक्तिप्राधान्य, नैतिक मूल्याचा अभाव वगैरे कारणपरंपरेमुळें आमच्या हातून या क्षत्रांतही मामुली कामापलिकडे काम होत नाहीं. उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण करण्याचे दिवस आहेत व तशी भाषाही आतां बोलली जात आहे, अशा वेळीं आमचे समाजास व राष्ट्रास पोषक होईल असा आमचा विचार व आचार असावयासच हवा. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांमार्फत हें दुर्घट काम आम्हांस घडवून आणतां



## ही दिवाळी

आमच्या सर्व ग्राहकांस, सर्व हितचिंतकांस, सर्व व्यापाऱ्यांस


**पूर्ण सुखाची जावो.**

किर्लोस्कर बंधु लिमिटेड, किर्लोस्करवाडी.

Kirloskar

—आमच्या ग्राहकांस—

**दीपावली व नवें वर्ष सुखाचें जावो.**




आयुर्वेद रसशाळा पुणें लि., पुणें ४

येईल, पण तसे द्रष्टे व निष्ठावंत कार्यकर्ते यांना त्या कामीं आम्हीं पुरस्कारलें पाहिजे. योग्य व लायक माणसांचा आम्हीं गौरवानें व आदरानें पुढाकार स्वीकारून स्वेच्छेनें स्वतःवर शिस्तीचें व संघटनेचें बंधन घातलें पाहिजे. अंगीं अभ्यासूवृत्ति बाणली पाहिजे. अधिकाराच्या जागांवर कोणीही व कसाही मनुष्य बसविण्याचें वेड सोडून दिलें पाहिजे. कामसू व विश्वासू अशा कळकळीच्या कार्यकर्त्यांस आम्हीं योग्य तो पाठिंबा दिला पाहिजे व त्याचबरोबर अकर्तृत्वाने भरलेल्या व मानास हपापलेल्या अशा सर्वांस नीट समजावून, सहकार्यानें त्यांची चुकीची दृष्टि निवळविण्यास लाविलें पाहिजे. समाजाची उन्नति, व्यक्तीची उन्नति झाल्यावांचून होत नाहीं ही गोष्ट प्रत्येक व्यक्तीचे गळीं उतरविली पाहिजे व म्हणूनच समाजोन्नतीच्या सर्व जबाबदाऱ्यांतून ज्या व्यक्तीची स्वतःचीच उन्नति व्हावयाची आहे त्यास टिपून वगळलें पाहिजे. यांतच समाज–कार्य व राष्ट्र–कार्य आहे. पण या गोष्टी सहजासहजीं होण्यासारख्या नाहींत. यासाठीं निष्ठेनें व तत्परतेनें झटावें लागेल. समाजांतील प्रचलित आचारविचारांचें वळण बदलतांना, कित्येक विरोधी घटना निर्माण होत असतात, त्यांना तोंड देण्याची सिद्धता करावी लागेल. स्वार्थांध, सत्ताभिलाषी व प्रसिद्धीलोलुप अशा आपल्याच माणसांचीं मनें मोडावीं लागून त्यांचे तात्कालिक रोष पत्करावे लागतील. त्यांत अपमान सहन करण्याचीही तयारी करावी लागेल. सहकारी तत्त्वाच्या महनीय तत्त्वाचा निष्ठेनें पुरस्कार करून निर्लोभ व निर्मळ वृत्तीचा अंगीकार करून जर जातीय भावनाविरहित असा नेटाचा प्रयत्न केला तर हें काम निश्चित होईल. देशाच्या व समाजाच्या ऋणाचे पांग फेडण्याची व्यक्तीच्या आयुष्यांतील ही कामगिरी कर्तव्यबुद्धीनें करणारे कार्यकर्ते आमच्यांत आहेत त्यांनींच यांत पुढाकार घेतला पाहिजे व आमच्या या देशास मिळालेल्या सुसंधीचा उपयोग केला पाहिजे. रात्र थोडी व सोंगें फार अशी स्थिति आहे, अशावेळीं एकच उपाय,

" विना सहकार नहि उद्धार "





The Sooryakiran Pharmacy Ltd.
दि सूर्यकिरण फार्मसी लिमिटेड
मॅनेजिंग एजन्टस्- पी. लिमये आणि कं.

असंख्य हितचिंतक,

ग्राहक व व्यापारी बंधू यांस:-

सप्रेम नमस्कार वि. वि.

आजपर्यंतच्या आपल्या अमोल सहकार्याबद्दल अत्यंत आभारी आहोंत.

आमचीं नित्योपयोगीं आयुर्वेदिक औषधे हेमकिरण (सर्वश्रेष्ठ शक्तिवर्धक) व किरणांगतेल (बाळ, बाळंतीण व अशक्तांना उपयुक्त मसाज तेल) हीं आपल्या परिचयाचीं आहेतच. त्या बरोबरच आम्ही हरघडीं लागणारीं अशीं औषधें अत्यंत स्वस्त किंमतीनें देण्याची व्यवस्था 'एकआणा पाकिट' या सिरीजमध्यें नुकतीच केली आहे.

शेवटीं, चालू दिपवाळी व नूतनवर्ष आपणांस सुखदायक व भरभराटीचें जावो अशी शुभेच्छा व्यक्त करून हें निवेदन पुरें करतों.

कळावें, लोभ असावा हे विनंति

मुंबई केन्द्र:-
१७३ गिरगांव रोड
मुंबई नं० ४

आपले,
पी. लिमये आणि कंपनी
मॅनेजिंग एजन्टस्

शेअर्स विकणें आहेत:—
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.
गोवर्धनवाडी, पुणें १.

गजकर्ण, खरूज, नायटे वगैरे त्वचा रोगांसाठीं
स्टार कंपनी, बेळगांव
गोवा मलम
गुण न आल्यास पैसे परत देऊं.

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# विमा अर्जापासून विमा करारापर्यंत

लेखकः—श्री. चिं. ग. जोशी, एम. एस्सी.

विमाअर्ज भरून दिला व कंपनीच्या वैद्यकीय तपासनीसाकडून तपासणी करवून घेतली कीं विमेदाराची जबाबदारी संपते पण येथूनच कंपनीच्या कार्यास प्रारंभ होतो. विम्याची पॉलिसी विमेदाराकडे रवाना करीपर्यंत एका विशिष्ट तंत्रांतून जावें लागतें. तरी आतां या तंत्राबाबत संक्षिप्त रूपानें विचार करूं.

विमा अर्ज कंपनीकडे परस्पर येतो किंवा अधिकृत एजंट अगर कंपनीच्या शाखा यांचेमार्फत येतो. ज्यावेळीं कंपनीकडे परस्पर अर्ज येतो त्यावेळीं विमेदारानें सर्व प्रश्नांचीं उत्तरें बिनचूकपणें दिलीं आहेत किंवा नाहींत याची तपासणी होते व कांहीं माहिती अपुरी राहिली असल्यास विमेदाराकडून जरूर ती माहिती मागविली जाते. विमेदारांच्या अनुक्रमणिकेवरून विमेदारानें कंपनीकडे पूर्वी अर्ज केला होता किंवा काय व केला असल्यास सदर अर्ज कोणत्या अटीवर स्वीकारला गेला होता याची छाननी होते. अखिल भारतीय आयुर्विमा कंपन्यांच्या संघानें अमान्य केलेल्या विमेदारांचे याद्यींत सदर अर्जदार आहे किंवा काय हेंही तपासावें लागतें. स्नेह्यांचा अहवाल व एजंटाचा अहवाल यांचीही छाननी केली जाते. कंपनीच्या अधिकृत वैद्यकीय तपासनीसाकडून विमेदाराची तपासणी केली जाते व सदर तपासणीचा अहवाल कंपनीकडे परस्पर पाठविला जातो.

विमाअर्ज व वैद्यकीय तपासनीस यांचे समोर भरून दिलेली माहिती यावरच विमाकरार आधारला जातो. तेव्हां विमेदारांनीं त्या माहितीच्या बिनचूकपणाकडे विशेष लक्ष पुरविणें इष्ट व त्यांच्याच हिताचें आहे.

पुष्कळशा कंपन्या स्त्रियांचे विमे कांहीं विशिष्ट कोष्टकाखालींच स्वीकारतील, तेव्हां स्त्रीविमेदारांची वैद्यकीय तपासणी करवून घेण्यापूर्वी ऑफिसची संमति मिळवावी लागेल.

कंपनीचे अधिकृत एजंट अगर शाखा यांचे मार्फत विम्याचे कागदपत्र पाठविले जातात त्यावेळीं सर्व कागद तपासून व पुरे करूनच मुख्य कचेरीकडे रवाना होतात.

मोठाल्या रकमांचे विमे असल्यास कंपनीच्या नियमाप्रमाणें एक अगर अधिक वैद्यकीय तपासनीसांकडून तपासणी होते.

अशा रीतीनें पुऱ्या केलेल्या विमाअर्जांची नोंद विमाअर्जरजिस्टरांत केली जाते. विमाअर्जांतील महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख असलेली टिपणी लावून सदर अर्ज कंपनीच्या मुख्य वैद्यकीय तपासनीसाकडे पाठविला जातो. कसून तपासणी करून तपासनीस शेरा मारतात. विम्याची रक्कम मोठी असल्यास अगर विमेच्छू दुय्यम दर्जाचें आरोग्य असलेला असल्यास सदर अर्ज वैद्यकीय संचालक मंडळाकडे त्याचे अभिप्रायाकरितां पाठविला जातो.

नंतर हे सर्व कागदपत्र कंपनीच्या मुख्याधिकाऱ्याकडे त्याचे मान्यतेकरितां पाठविले जातात. विम्याची रक्कम मोठी असल्यास संचालक मंडळींतील दोन सदस्यांकडून निर्णय घेतला जातो.

कौटुंबिक वृत्तांत व स्वतःच्या प्रकृतीबद्दलचा वृत्तांत समाधानकारक असल्यास नेहमीच्या दरांत विमा स्वीकारला जातो. अर्जदाराचा धंदा जोखमीचा असल्यास अगर विमेदार स्त्री असल्यास जादा आकार घेऊनच विमा स्वीकारतात. तसेंच विम्याची रक्कम व अर्जदाराचें उत्पन्न यांचे प्रमाणांत विशेष तफावत आहे किंवा काय हें नैतिक धोक्याच्या दृष्टीनें तपासावें लागतें.

संचालक मंडळाच्या अगर मुख्याधिकाऱ्याच्या निर्णयाची नोंद विमा अर्जावर केली जाते व ज्या अर्जावर विमा स्वीकारला असेल त्याप्रमाणें कंपनीचें स्वीकारपत्र विमेदाराकडे रवाना होतें. अर्ज नामंजूर केला असल्यास विमेदाराकडे खेदप्रदर्शक पत्र पाठविलें जातें.

प्रत्येक कंपनी एका विमेदाराच्या आयुष्याची जोखीम एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच स्वीकारते व या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची जोखीम इतर कंपन्यांत विभागून देते. तेव्हां इतर कंपन्यांनीं जोखीम स्वीकारल्याबद्दलची लेखी मान्यता पाठविली म्हणजेच मूळ विमेदारास स्वीकारपत्र रवाना होतें. पण विमेदाराचे दृष्टीनें विमाकराराची सर्वस्वी जबाबदारी मूळ कंपनीवरच असते. जास्त जोखिमेची विभागणी हा कंपन्यांचा अंतर्गत प्रश्न आहे.

स्वीकारपत्राच्या रजिस्टरांत नोंद करून मगच प्रत्येक स्वीकारपत्र रवाना होतें. रवाना झालेल्या तारखेपासून बहुशः एक महिन्याचे आंत पहिला हप्ता भरावयाचा असतो. हा हप्ता भरण्यास उशीर झाला तर विमेदारास आरोग्याचा प्रतिज्ञा लेख भरून द्यावा लागतो. पहिल्या हप्त्याची रक्कम ऑफिसकडे आली कीं पहिल्या हप्त्याची पावती तयार होऊन विमेदाराकडे रवाना होते व विमापॉलिसी तयार करण्यास सुरवात होते. तयार झालेल्या विमाकराराची नोंद विमाकरारपत्राच्या रजिस्टरांत होते व नंतर विम्याची पॉलिसी परस्पर विमेदाराकडे अगर एजंट अथवा शाखा यांमार्फत रवाना होते.

ज्या कंपन्यांचें चालू काम बरेंच आहे व ज्यांचेकडे प्रतिवर्षी नवें काम मोठ्या प्रमाणांत येतें अशा कंपन्या कामाचा उरक होण्याच्या दृष्टीनें ॲड्रिया अगर ॲड्रीयो ग्रॉफ या यांत्रिक साधनांचा उपयोग करतात. ॲड्रीयाचे सहाय्यानें विमाअर्ज रजिस्टर, स्वीकारपत्र रजिस्टर, पहिल्या हप्त्याची पावती, विमाकरारपत्र व विमा करारपत्र रजिस्टर हीं बिनचूक, सुबक व अगदीं थोड्या अवधींत छापवून घेतां येतात.

सूत्ररूपानें असें म्हणतां येईल कीं, विमाअर्ज व तदनुषंगिक कागदपत्र बिनचूक भरले गेल्यास व विमेदाराचा कौटुंबिक वृत्तांत व स्वतःच्या प्रकृतीबद्दलचा वृत्तांत निर्दोष असल्यास विमाकरार बहुधा आठ-दहा दिवसांचे आंत विमेदाराकडे रवाना होऊं शकतो. मोठ्या रकमांचे विमे असल्यास इतर कंपन्यांकडून मान्यता मिळण्यास जो अवधि लागतो तो अगदीं अपरिहार्य असतो.

वरील विवेचनावरून विमा करार तयार होईपर्यंत किमान अवधि किती लागतो याची सर्वसामान्य कल्पना विमेदारास येईल व कित्येक प्रसंगीं कंपनीच्या कार्यक्षमतेबद्दल अकारण निर्माण होणारे गैरसमज दूर होतील.




# सोळा कीं अठरा पेन्स?

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.

रुपयाचा हुंडणावळीचा दर स्टर्लिंगशीं कायम निगडित आहे या भूमिकेवरून येत्या डिसेंबरापर्यंत त्याचा भाव काय रहावा हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित होत आहे. रुपयाचें स्टर्लिंगशीं १९३१ सालीं नातें जोडलें गेलें. तेव्हांपासून पुढचीं सात आठ वर्षें जागतिक मंदीचीं गेलीं. त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशास तीं जास्तच जाणवलीं व त्याचा परिणाम आपल्या आयात-निर्यात व्यापारांत आपल्या बाजूनें राहणारी तफावत कमी कमी होत जाऊन मोठ्या प्रमाणांत सोन्याची परदेशीं निर्गत होण्यांत झाला. साहजिकच या काळांत सोळा पेन्सांचा भाव हिंदुस्थानला फायदेशीर ठरला असता व म्हणून भाव सोळा पेन्स पुन्हा व्हावा म्हणून मधून मधून उचल केली जात होती.

राष्ट्रांतरीय व्यापारांत हुंडणावळीच्या दराला महत्त्व निःसंशय आहे. तो कमीजास्त करण्यानें आयातीला व निर्यातीला कृत्रिम चालना मिळूं शकते, विशिष्ट उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळूं शकतें व कालांतरानें देशांतर्गत किंमतीवर त्याचा परिणाम होऊं शकतो. जे देश स्वतंत्र होते त्यांनीं या मंदीच्या काळांत आपणास सोईस्कर होईल अशा रीतीनें आपली हुंडणावळ बदलून टाकण्यास कमी केलें नाहीं.

## उत्पादन आणि हुंडणावळ

आतां हुंडणावळीचा दर जो ठरतो तो त्या त्या देशांत त्या त्या चलनाची क्रयशक्ति काय आहे यावर अवलंबून राहतो. ठोकळ मानानें हिंदुस्थानांत रुपयाला पायली तांदूळ मिळत असले व इंग्लंडमध्यें अठरा पेन्सला पायली तांदूळ मिळत असले तर रुपयाचें अठरा पेन्सांशीं बरोबर समीकरण बसलें असतें. पण दोन्ही देशांत तांदळाच्या उत्पादनांतच जर फरक पडला तर हें समीकरण बिघडल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून जरी हुंडणावळीच्या बदलानें व्यापाराला कृत्रिम चालना मिळत असली तरी सरतेशेवटीं देशांतल्या उत्पादनावरच हुंडणावळीला अवलंबून रहावें लागेल. देशांतलें उत्पादन देशाच्या गरजा भागवून जर उरत असेल तर शिल्लक माल परदेशीं पाठविण्याचा प्रश्न उत्पन्न होतो व या परिस्थितींत निर्गतीला चालना मिळेल अशा रीतीनें हुंडणावळींत थोडाफार कृत्रिम फेर करणें संयुक्तिक ठरेल. याच्या उलट देशांतल्या गरजा भागविण्याइतकें उत्पादन जर होत नसलें तर परदेशांतून आयात करणें भाग आहे. म्हणजे परदेशच्या व्यापाऱ्यांना आपल्या देशांत माल पाठविण्यास प्रवृत्त करणाच्या दृष्टीनें त्यांना फायदेशीर वाटेल अशी आपली व त्यांची हुंडणावळ ठरवली पाहिजे. मात्र या ठिकाणीं हें गृहीत आहे कीं आपली हुंडणावळ कोठल्याही देशाच्या दराशीं ठरविण्यास आपण पूर्ण स्वतंत्र आहोंत. जर आपण स्वतंत्र नसलों व विशिष्ट हुंडणावळीशीं पारतंत्र्यानें कायमचे बांधले गेलों असलों तर जेत्यांच्या तोंडानें पाणी प्यावें लागून ते जेवढे मान्य करतील तेवढेच फेरफार करणें भाग पडेल व व्यापारावर त्या मानानें बंधन पडेल.

## हिंदुस्थानच्या आजच्या गरजा

हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत काय गरजा आहेत हें पाहिलें असतां हुंडणावळ कशी ठरवावी याबद्दल मार्गदर्शन चटकन होईल. पहिला प्रश्न अन्नवस्त्राचा. वाढत्या लोकसंख्येला येथलें अन्नवस्त्राचें उत्पादन फारच अपुरें पडत आहे व दोन्ही गोष्टी कडक नियंत्रणाखालीं असून जेमतेम भागेल येवढ्याच येथल्या जनतेला त्या आज मिळूं शकत आहेत. त्यांच्या किंमतीही नियंत्रित आहेत. हें नियंत्रण जर नसतें तर चलनवाढीमुळें भाव भरमसाट वाढून गोरगरीब उपाशीं मेले असते. सामान्य काळांत किंमती वाढल्या असत्या तर तावडतोब आयात वाढली असती, व देशांतलेंही महागड्या वस्तूंचें उत्पादन वाढलें असतें. पण आज आयात वाढविणें बंधनांत आहे व बंधनें नसतीं तरी जागतिक दुष्काळानें ती लवकर वाढणें अशक्यप्राय आहे. येथलें अन्नाचें उत्पादन शास्त्रीय पद्धतीनें व वाढत्या गरजा लक्षांत घेऊन वाढविण्याकडे आज शतक गेलें पण लक्ष देण्यांत आलेलें नाहीं व वारंवार दुष्काळ भोगावे लागत आलेले आहेत. तेव्हां एकदम अन्नाचें उत्पादन तर वाढवतां येत नाहीं अतएव अन्नाकरतां परदेशाकडे आणखी पांच-पंचवीस वर्षें तरी पाहणें भाग आहे. याचा अर्थ असा कीं, जे देश धान्य निर्गत करणारे आहेत, (म्हणजे अमेरिका, कॅनडा, ब्रह्मदेश, इंडोनेशिया व आस्ट्रेलिया) त्यांच्याशीं त्यांना इकडे धान्य पाठविण्याला उत्तेजन मिळेल असा त्यांच्या नाण्याशीं आपला हुंडणावळीचा दर ठरविला पाहिजे. कापडाची गोष्ट थोडी वेगळी आहे. येथलें कापडाचें उत्पादन जर परदेशी यंत्रसामग्री मिळत गेली तर थोडक्या काळांत पुष्कळच वाढण्यासारखें आहे, इतकेंच नव्हे तर परदेशींही माल पाठवितां येऊं शकेल. कापडाप्रमाणेंच इतर अनेक उद्योगधंदे आहेत कीं जेथें आपणास यंत्रसामग्रीची तांतडीनें जरूर आहे. यंत्रसामग्री निर्यात करणारे देश मुख्यतः इंग्लंड व अमेरिका. अर्थात् त्यांनाही फायदा वाटेल असा रुपयाचा व पौंड आणि डॉलर यांचा संबंध ठरावयास हवा.

## गुंतागुंतीचे आर्थिक संबंध

वरील त्रोटक विवेचनावरून निष्कर्ष निघेल कीं जर आज या देशांत आपलें सरकार आलेलें आहे तर त्यानें प्रत्येक देशाशीं कांहीं वर्षांपुरता करार करून रुपयाचा व त्यांच्या नाण्याचा दर ठरवून घ्यावा. पण झालेल्या महायुद्धामुळें ज्या इंग्लंडशीं आपला सर्वांत मोठा आयात व्यापार असतो त्याचे व आपले संबंध जास्त गुंतागुंतीचे झालेले आहेत. इंग्लंडचे आपण कायमचे देणेकरी होतों. आतां आपण मोठ्या प्रमाणांत इंग्लंडचे धनको होऊन बसलोंत. धनकोनें मागितलें म्हणजे ऋणकोस देणें देऊन टाकणें भाग असतें व न दिल्यास कोर्टांतून तें वसूल करून घेतां येतें. पण येथें तशी स्थिति नाहीं हें उघड आहे. या ऋणकोकडून येणारी रकम इतकी मोठी—हजार बाराशें कोट रुपये—आहे कीं ती हप्त्या हप्त्यानें देऊन टाकण्यास ऋणकोस पिढ्यान पिढ्या पुरणार नाहींत. बरें रकम द्यावयाची ती तो आपलें उत्पादन वाढवून, आपल्या गरजा भागवून, इतर देशांना असलेलें देणें त्याचा विचार करून, संभाव्य तिसऱ्या महायुद्धाचा विचार करून, मग दरसाल काय द्यावयाची तें ठरविणार; तेव्हां अडला नारायण हिंदुस्थान त्याला गाढवाचे पाय धरणें भाग आहे. रुपया-स्टर्लिंग कायद्यानें निगडित असले काय नसले काय, इंग्लंडला साधारणतः खूष ठेवणें भाग आहे. सबब रुपयाचा भाव अठराच काय वीस-बावीस पेन्स ठेवला तरी चालून इंग्लंडला इकडे जास्त माल पाठविण्याची बुद्धि होऊन आपलें येणें लवकर वसूल होईल. पण यांत आणखी एक भानगड आहे ती अशी कीं युद्धोत्तर राष्ट्रा-राष्ट्रांनीं आपलीं देणीं-घेणीं पटापट करून घेतांना जागतिक पैसा फंड व जागतिक बँक यांच्यातर्फें करून घेणेचीं आहेत.

म्हणजे आज राजकीय दृष्ट्या हिंदुस्थान स्वतंत्र होत असला तरी यापुढें आर्थिक दृष्ट्या तो जागतिक संघटनेशीं चांगलाच बांधला गेलेला आहे व त्याला कोठल्याही राष्ट्राशीं स्वतंत्र करार करणें कठीण आहे. जागतिक संघटनेंतून बाहेर राहणेंही अशक्य असा दुहेरी पेंच येथें आहे. त्यांतून मार्ग काढतांना हुशारीनें राहिलें पाहिजे. जोंपर्यंत सर्व देशांचें कुठल्याही एका परिमाणाशीं, उदाहरणार्थ सुवर्णाशीं, नातें जोडलें गेलें नाहीं तोंपर्यंत सगळ्या जगांतच हुंडणावळीचा विचका चालणार आहे. डॉलरला सध्यां सगळ्यांत जास्त महत्त्व आल्यानें सुवर्णाची जागा डॉलरनें घेतली तरी हरकत नाहीं, पण तो तरी स्रोनासारखा राहूं शकेल कांय ? सोनें सुद्धां स्थिर राहूं शकत नाहीं तर घोटाळ्याची परिस्थिति असलेला डॉलर राहूं शकेल असें वाटत नाहीं. जागतिक परिस्थिति दोन-पांच वर्षांत निवळेल व तिसऱ्या महायुद्धाची भीति राहिलेली नाहीं अशी कल्पना केली तर सध्या हिंदुस्थाननें कायमचें कुठल्याही राष्ट्राशीं बांधून घेणे श्रेयस्कर नाहीं. इंग्लंड अठरा पेन्सांवर संतुष्ट असेल तर तो कायम ठेवण्यांत सध्या नुकसान नाहीं. फक्त येवढेंच कीं जागतिक फंडाला आपला दर कळवितांना अमुक एक वर्षपर्यंत ह्या दर आहे असें सांगतां आलें तर बरें.

**मास्कोला हिंदी वकील ?** —रशियन परराष्ट्रमंत्री एम्. मोलोटाव्ह यांची भेट श्री. कृष्ण मेनन यांनीं पं. नेहरूंचे प्रतिनिधी म्हणून घेतली होती. त्यानंतर त्यांची नेमणूक मास्को येथील हिंदी वकील म्हणून होणार असल्याची वार्ता प्रसृत झाली होती. या बातमींत कांहीं तथ्य नाहीं असें खुद्द श्री. मेनन यांनींच आतां जाहीर केलें आहे.


# The Bank of Kolhapur Limited.

**Incorporated in Kolhapur in 1926; the liability of members being limited.**

*Under the patronage of & largely supported by The Government of H. H. The Chhatrapati Maharaj of Kolhapur.*

| | |
|---|---|
| Capital Authorised | Rs. 10,06,500/- |
| Capital Issued & Subscribed | Rs. 5,06,500/- |
| Capital Paid-up | Rs. 2,53,000/- |
| Reserve | Rs. 4,05,000/- |
| Total working Fund about | Rs. 200,00,000/- |

**Head Office, Kolhapur,**
**The Bank of Kolhapur Bldgs., Laxmipuri, Kolhapur**

*Branches:—*

(1) Shahupuri-Kolhapur (2) Gujari-Kolhapur
(3) Jaysingpur. (4) Ichalkaranji.
(5) Peth Vadgaon. (6) Malkapur.
(7) Gadhinglaj.

**A Branch at Bombay will be shortly opened.**

**Current & Savings Bank Accounts opened and Fixed Deposits** received on terms which may be ascertained on application.

**Loans, Overdrafts & Cash Credits:—**

The Bank grants accommodation on terms to be arranged against approved securities.

Safe Deposit Vault at Head Office, Kolhapur. Rates on application. Banking Business of every description transacted.

Consent of the Government of India and Kolhapur Government has been received by the Bank for the increase of Capital. The Capital after the New Issue will be :—

| | |
|---|---|
| Capital Authorised ... | ... Rs. 40,06,500/- |
| Capital Subscribed ... | ... Rs. 20,06,500/- |
| Capital Paid-up ... | ... Rs. 10,03,250/- |

**V. A. Sawant**
*Ag. Manager.*



लहान प्रमाणावर व घरगुती तयार होणाऱ्या वस्तूंस उत्तम प्रकारें प्रसिद्धी विक्री मिळवून देणारें एकमेव केंद्र

# व्यापार-संवर्धनगृह-पुणें

अधिक माहितीसाठीं संस्थेस भेट द्या किंवा पत्रव्यवहार करा.





स्क्विब्स एग्यु-स्पेसिफिक
मलेरिया-इन्फ्लुएंझा
व
इतर सर्व तापांवर रामबाण. ( घोडा छाप तापाचा दवा )
माव्हन सन्स आणि कंपनी, क्वालिफाइड केमिस्ट.
३५२ अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई ३.



लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

**नांगर —यांचे— चरक**

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपे ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली–पे–ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,८९,६५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ४८ लाखांवेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर.
आर. बी. साळवेकर,
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

बडोदें सरकारच्या आश्रयानें संस्थापित

## दि बडोदा बॅटरीज् लिमिटेड.

गोया गेट, बडोदा

★ ऑर्डिनरी शेअर्स रु. २० चे प्रत्येकीं पेडअप रु. १०. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, ५½ टक्के व्याजाचे, प्रत्येकीं रु. ५० चे पेडअप रु. २५.

★ १,२,३ व ४ वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येत आहेत.

★ सुप्रसिद्ध "तेज" बॅटरीज तयार करणारा राष्ट्रीय उद्योगधंदा.

मॅनेजिंग एजंटस :

पानसे आणि कंपनी,

गोया गेट, बडोदा.

किंवा, सरदार पानसेवाडा, शुक्रवार पेठ, पुणें.

या पैकीं कोणत्याहि ठिकाणीं माहिती पत्रकें व अर्जाचे फॉर्म्स इत्यादि मिळतील.

## ब्रिटिश अर्थव्यवस्थेचें संक्रमण

गेल्या वर्षी ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकींत मजूर-पक्षास हुकमी मताधिक्य मिळालें. मजूर-सरकार अधिकारावर आल्यावर ब्रिटिश अर्थव्यवस्थेंतील अनियंत्रित खाजगी भांडवलाला पहिल्या इतकें स्वातंत्र्य रहाणार नाहीं हें उघडच होतें. त्या दृष्टीनें पहिल्या वर्षभराच्या कालानंतर ब्रिटिश अर्थव्यवस्थेचें स्वरूप कसें आहे तें पाहणें उद्बोधक आहे. स्थूलमानानें असें म्हणतां येईल कीं भांडवलशाही अर्थव्यवस्था व संपूर्ण समाजवादी अर्थव्यवस्था यांच्या दरम्यान सध्याची अर्थव्यवस्था आहे. बँक ऑफ इंग्लंडचें राष्ट्रीयकरण करण्यांत आलें असून तिच्या भागीदारांना पूर्वी इतकाच नफा देणारा स्टॉक देण्यांत आला आहे. तथापि मिडलंड, लॉइड्स् यांच्यासारख्या बड्या खाजगी बँका अजून नियंत्रणाच्याहि बाहेर आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कोळशाच्या खाणीवरील खाजगी मालकी काढून टाकून त्याऐवजीं नॅशनल कोल बोर्ड नेमण्यांत आलें आहे. या बोर्डावर मजूर, उद्योगधंद्यांचे मालक, शास्त्रज्ञ व बका यांचे प्रतिनिधी नेमण्यांत आले आहेत. देशांतील कोळशाचें उत्पादन वाढवून, खाणींतील यंत्रसामुग्री अगदीं अद्यावत् पद्धतीची बसविणें हें या बोर्डाचें मुख्य कार्य आहे. ब्रिटिश ध्वनिक्षेपक कंपनी ( बी. बी. सी. ) सरकारच्या ताब्यांतील मक्तेदारी संस्था होती. तिची मुदत आणखी ५ वर्षें वाढविण्यांत आली आहे. मजूरपक्षानें राष्ट्रीय विमा बिल मंजूर केलें असून, त्यांतील योजना 'बीव्हरिज' योजनेप्रमाणेंच जन्मापासून मरणापर्यंत प्रत्येक व्यक्तीची काळजी घेणारी आहे.


याशिवाय पार्लमेंटपुढें पुढील बाबींचें राष्ट्रीयकरण अगर नियंत्रण करण्याच्या योजना आहेत:—(१) नागरी वैमानिक वहातूक, (२) टेलिकम्युनिकेशन्स, (३) लोखंड व पोलादाचे कारखाने, (४) राष्ट्रीय आरोग्य, (५) अणुशक्तीचा विकास, माहिती, तपासणी व पेटंटस्.

सुताच्या-कापडाच्या गिरण्या, त्याचप्रमाणें घरें बांधण्याची सामुग्री तयार करणारे कारखाने व लहान प्रमाणावरील धातूंचे कारखाने, हे आतांच राष्ट्राच्या मालकीचे करण्यांत येणार नाहींत. या उद्योगधंद्यांच्या बाबत १६ जणांचीं चौकशी मंडळें नेमण्यांत येणार असून त्या मंडळांनीं व्यापार मंडळाकडे अहवाल सादर करावयाचे आहेत. आतांपर्यंत कापड व चिनीमातीचे कारखाने यांच्या मंडळांचे अहवाल आले आहेत. त्यांत (१) राष्ट्रीयकरण करूं नये, (२) धंद्यांचें आधुनिकत्व टिकविण्यासाठी सरकारनें कांहीं मर्यादेपर्यंत हस्तक्षेप करावा, (३) स्पर्धा असावी, अशा सूचना करण्यांत आल्या आहेत.

वीजपुरवठ्याचें राष्ट्रीयकरण करणें मजूर सरकारच्या उद्दिष्टांत असून त्याशिवाय गॅस, जळण व औद्योगिक शक्ति हीं सुद्धां राष्ट्रीयकरणाच्या यादींत आहेत. जहाजांची वहातूक सोडून रेल्वे, मोटारी, कालवे, गोद्या व बंदरें यांमधील वहातुकींचें एकत्रीकरण करण्याची मजूर सरकारची योजना आहे.

पेट्रोलचा धंदा राष्ट्राच्या मालकीचा करावा अशी सूचना जूनमधील मजूर पक्षाच्या वार्षिक अधिवेशनांत करण्यांत आली होती. युद्धकाळांतील नियंत्रणांचा फायदा घेऊन शेतीच्या मालाच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यांत येत आहे. पेट्रोलिअम व शेती यांचें राष्ट्रीयकरण १९५० अगर त्यानंतर कमी-अधिक प्रमाणांत होण्याचा संभव आहे.



# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा

—अशा रीतीनें ही दीपावली साजरी करा—

- आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षापासून फक्त १५ वर्षेपर्यंत आम्हांस दरसाल आपण ८३७ रुपये द्या.
- आम्हीं आपणांस ५० व्या वर्षापासून पुढें १५ वर्षेपर्यंत दरसाल १,००० रुपये निश्चित देऊं.
- दैवयोगानें ५० व्या वर्षापूर्वी मृत्यू आला तर आमचे हजार रुपयांचें ठराविक वर्षासन तावडतोब सुरू होईल.

खालील पत्त्यावर वा विविध शाखांना लिहा—

मॅनेजर

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि. सातारा**

— पुणें शाखा —

१७९ बुधवार, कर्वे बिल्डिंग, पुणें शहर



# कोल्हापूर स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

सन १९४५-४६ इ.

—प्रेसिडेंट—

१ मे. राव. एस. जी. दाभोळकर, B. A., LL. B. ॲडव्होकेट

—व्हा. प्रेसिडेंट—

२ मे. शंकरराव यशवंतराव रणनवरे, व्यापारी व जमीनदार
३ मे. कर्नल के. एस. खानविलकर
४ सरदार बहादूर डी. डी. जाधव, ओ. बी. आय.
५ मे. आर. डी. आडनाईक
६ मे. टी. जी. मोहते, मॅ. डायरेक्टर शेतकरी सहकारी स. वि. सं. लि. व जमीनदार ( यळगूड )
७ मे. व्ही. डी. देसाई, व्यापारी व मेंबर इलाखा पंचायत करवीर
८ मे. एस. आर. पाटील जमीनदार ( कुरुकली )
९ मे. गणपत आबाजी डोंगळे, व्यापारी, जमीनदार
१० मे. डी. ए. सावंत, सेक्रेटरी, मार्केट कमिटी [ सरकार नियुक्त ]

—मॅनेजिंग डायरेक्टर—

११ मे. एन. टी. सरनाईक

सहकारी, शेतकी व बिगर शेतकी सोसायट्यांना लागणाऱ्या कर्जाऊ पैशाचा पुरवठा माफक व्याजाचे दरानें केला जाईल. त्याचप्रमाणें चालू, सेव्हिंग, मुदतबंदीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातील.

चेक, हुंड्या वगैरे बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. टी. सरनाईक, मॅ. डायरेक्टर



# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर.

—स्थापना १९१८—

**हेडऑफिसः—सोलापूर**

—: शाखा :—

कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा, मोहोळ व सांगोला

—चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. एच्. व्ही. केळकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सोलापूर

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... | रु. १,३८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | ... ... | रु. १,५७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... ... | रु. ३६,५०,००० |
| सन १९४५-४६ चा नफा | ... ... | रु. ३३,४७८ |

मंजूर झालेलें डिव्हिडंडः सहा टक्के

हेडऑफिसांत व शाखाऑफिसांत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात. ठेवींचे दराबाबत व नियमाबाबत समक्ष ऑफिसांत चौकशी करावी अथवा अर्ज करून नियम मागवावेत.

शं. वि. अभ्यंकर
मॅनेजर

## खेळत्या चलनाचा विस्तार

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| | नोटा | रुपये ( नाणी व नोटा ) | एकूण |
|---|---|---|---|
| १९३८–३९ ... | १८९,१० | ... | ... |
| १९३९–४० ... | २३८,५५ | ... | ... |
| १९४०–४१ ... | २५७,६६ | ... | ... |
| १९४१–४२ ... | ४१०,०६ | ... | ... |
| १९४२–४३ ... | ६४३,५८ | ... | ... |
| १९४३–४४ ... | ८८२,४९ | १३७,३३ | १,०१९,८२ |
| १९४४–४५ ... | १,०८४,८८ | १४७,३८ | १,२३२,२६ |
| १९४५–४६ ... | १,२१८,७७ | १६५,७३ | १,३८४,५० |
| जुलै १९४५ ... | १,१२८,७३ | १४९,९८ | १,२७८,७१ |
| ऑगस्ट „ ... | १,१३९,४५ | १४९,०२ | १,२८८,४७ |
| सप्टेंबर „ ... | १,१४१,८४ | १४८,३० | १,२९०,१४ |
| ऑक्टोबर „ ... | १,१५६,१३ | १४८,९१ | १,३०५.०४ |
| नोव्हेंबर „ ... | १,१७६,३७ | १४९,३८ | १,३२५,७५ |
| डिसेंबर „ ... | १,२१०,८९ | १४९,७८ | १,३६०,६७ |
| जानेवारी १९४६ | १,१९९,६९ | १५८,४८ | १,३५८,१७ |
| फेब्रुवारी „ ... | १,१९५.९० | १६४,३० | १,३६०.२० |
| मार्च „ ... | १,२१८,७७ | १६५,७३ | १,३८४,५० |
| एप्रिल „ ... | १,२३२,७४ | १६६,६७ | १,३९९,४१ |
| मे „ ... | १,२३३,९९ | १६८,३० | १,४०२,२९ |
| जुन „ ... | १,२३७,८४ | १७१,१० | १,४०८,९४ |
| जुलै „ ... | १,२१५,४६ | १६९,११ | १,३८४,५७ |
| ऑगस्ट „ ... | १,२०६,७८ | ... | ... |

## घाऊक भाव, रहाणीचें मान व रोख्यांच्या किंमती

| | घाऊक बाजारभाव १९ ऑगस्ट १९३९ अखेरचा आठवडा = १०० | मुंबईमधील कामगारांच्या रहाणीचें मान जुलै, १९३३ जून १९३४ = १०० | रोख्यांच्या किंमती १९२७–२८ = १०० | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सरकारी रोखे | औद्योगिक रोख ठराविक व्याजाचे | औद्योगिक रोख अनिश्चित व्याजाचे |
| १९३९–४० | १२५.६ | १०८ | ११४.१ | १३५.३ | १११.७ |
| १९४०–४१ | ११४.८ | ११४ | ११४.६ | १४७.५ | ११७.४ |
| १९४१–४२ | १३७.० | १२८ | ११५.९ | १५५.९ | १२९.० |
| १९४२–४३ | १७१.० | १७४ | ११५.० | १४४.९ | १३८.६ |
| १९४३–४४ | २३६.५ | २३७ | ११७.२ | १६४.३ | १८२.२ |
| १९४४–४५ | २४४.२ | २३६ | ११८.० | १७६.२ | १९७.३ |
| १९४५–४६ | २४४.९ | २३९ | ११८.६ | १८७.० | २२०.८ |
| जुलै १९४५ | २४४.४ | २४० | ११८.४ | १८६.२ | २१७.० |
| ऑगस्ट " | २४४.१ | २४३ | ११८.० | १८७.७ | २१२.६ |
| सप्टेंबर " | २४२.२ | २४० | ११८.३ | १८७.४ | २१३.३ |
| ऑक्टोबर " | २४४.१ | २४२ | ११८.७ | १८७.३ | २१४.९ |
| नोव्हेंबर " | २४३.६ | २४२ | ११९.३ | १८७.७ | २२५.३ |
| डिसेंबर " | २४७.१ | २४२ | ११९.० | १८९.० | २३२.४ |
| जाने. १९४६ | २५०.२ | २४२ | ११९.३ | १८९.८ | २३८.६ |
| फेब्रुवारी " | २५२.८ | २४३ | ११९.२ | १९०.८ | २३६.७ |
| मार्च " | २५३.३ | २४७ | ११९.२ | १९१.३ | २४९.७ |
| एप्रिल " | २५२.७ | २४८ | ११९.८ | १९३.८ | २५१.८ |
| मे " | २५५.० | २४९ | ११९.४ | १९५.९ | २६७.३ |
| जून " | २६३.५ | २५९ | १२०.७ | २००.५ | २८०.९ |
| जुलै " | २७०.१ | २६८ | १२१.९ | २०२.८ | ३०३.८ |
| ऑगस्ट " | २७१.३ | ... | ... | ... | ... |


गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना सारखीच उपयोगी पडणारी —संपूर्ण तुमच्या मालकीची

**श्रीशिवाजी नॅशनल बँक लिमिटेड**

हड ऑफिसः—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
ब्रँच ऑफिसः—लक्ष्मी मार्केट, मिरज ( सि. )

—आमचें वैशिष्ट्य—




* १० रुपये भरून ५ वर्षांनंतर १२॥ रुपये मिळणारे "स्वराज्य बॉन्ड"ची आकर्षक व फायदेशीर योजना.
* मंथली फिक्स्ड डिपॉझिटची त्रैवार्षिक व पंचवार्षिक अभिनव योजना. दरमहा १ रुपया भरून ३ वर्षांनंतर ३६ चे ४० व पांच वर्षांनंतर ६० चे ७० या प्रमाणांत रकमा वाटल्या जातात.
* दररोज ने-आंण करणारी "डेलि सेव्हिंग्ज"ची उपयुक्त योजना. याशिवाय इतर सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात. भेटा अगर लिहा.

नारायणराव हणमंतराव साळोखे
मॅनेजिंग डायरेक्टर






# दि बँक ऑफ कराड लि.

—कराड—

( स्थापना ३-४-१९४६ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेले भांडवल | | रु. २,५०,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. १,२५,००० |
| ठेवी ... | ... | रु. ६,५०,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, कराड ( चेअरमन )
(२) ,, द्वारकादास हरीदास वखारीया, मुंबई
(३) ,, शंकरराव प्रभाकर ओगले, ओगलेवाडी
(४) ,, विष्णू रामचंद्र वेलणकर, सांगली
(५) मेसर्स एस. व्ही. सुपनेकर कुलकर्णी ॲन्ड सन्स लि. तर्फें श्री. रामकृष्ण गोविंद कुलकर्णी, पुणें
(६) श्री. पांडुरंग केशव शिराळकर, कराड
(७) डॉ. वामन गोविंद देशपांडे, कराड
(८) श्री. गोपाळ रामकृष्ण काळे, कराड
(९) ,, विष्णू दत्तात्रय शिराळकर, कराड ( मॅनेजिंग डायरेक्टर )

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

**महादेव विनायक, खंडकर**
मॅनेजर



# दि कमर्शियल बँक लि.

—कोल्हापूर—

स्थापना १८३६

हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी कोल्हापूर

शाखा—(१) पापाची तिकटी, कोल्हापूर
(२) इचलकरंजी
(३) हुपरी

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,०००-०-० |
| विक्रीस काढलेलें | रु. २,००,०००-०-० |
| वसूल झालेलें | रु. १,००,०००-०-० |
| रिझर्व व इतर फंडस | रु. ५०,०००-०-० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ३०,००,००० चे वर |

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

—भेटा अगर लिहा—

बी. डी. मगदूम, अकौंटंट
गणपतराव लक्ष्मणराव साळोखे, मॅनेजिंग डायरेक्टर



कोल्हापूर इलाख्यांत स्थापन झालेली पहिली सहकारी संस्था.

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोल्हापूर.

स्थापना सन १९१३ इ.

**एकूण खेळतें भांडवल, रु. ५ लाखांचेवर.**

अधिकृत भांडवल रु. ७५,०००

रिझर्व फंड व इतर फंडस् रु. १,१८,३४३

प्रेसिडेंटः—श्री. नारायणराव हणमंतराव साळोखे

व्हा. प्रेसिडेंटः—श्री. दिनकरराव गणपतराव शिंदे

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. ज्ञानदेव हरी सरनाईक, श्री. ज्ञानदेव जोतीराव सासने
श्री. वासुदेव बंडो हिरवडेकर, श्री. आणाप्पा बाबूराव पाडळकर
श्री. आनंदराव शंकरराव जगताप, श्री. शंकर बळवंत प्रभावळे
श्री. बलराम लक्ष्मण बोंगाळे, श्री. पांडुरंग हरी हळदकर

सुपरवायझिंग कौन्सिलर्स

चेअरमन, श्री. नकुल लक्ष्मण बोंगाळे. कौन्सिलर, श्री. रामचंद्रराव ईश्वरराव गायकवाड. कौन्सिलर, श्री. श्रीपाद जिवाजी देशपांडे, कौन्सिलर, श्री कृष्णाजी गोविंद मानकर. कौन्सिलर, श्री. राजाराम नारायण राजाज्ञा.

बँकिंगसंबंधीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेची सांपत्तिक स्थिती दर्शविणारें सांपत्तिक पत्रक कायद्यानुसार, दर तिमाहीस सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध केलें जात असतें. हुंडीचा व्यवहार केला जात असतो. ठेवींच्या व्याजाच्या दरासंबंधीं व विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

कें. जी. राणे, मॅनेजर.
नारायणराव हणमंतराव साळोखे, प्रेसिडेंट.
दि कोल्हापूर अर्बन को. ऑ. बँक लि.



फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

# श्रीलक्ष्मी सं. को. बँक लि., फलटण

( स्थापना १-२-१९२६ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. १,४७,०५० |
| वसूल भांडवल | रु. ६१,७३० |
| फंड | रु. १,१५,७६१ |
| ठेवी | रु. २७,३६,८४२ |
| खेळतें भांडवल | रु. २९,१४,३४१ |

ठेवी—चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

कर्ज—जोडलेल्या सहकारी पतपेढ्या व बँकेचे भागीदार यांना सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज, कॅश क्रेडीट, ओव्हर ड्रॉफ्ट वगैरे मिळतो,

विमा—वेस्टर्न इंडिया, नेपच्युन, एशियन व कॉमनवेल्थ या कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्यांत येतात.

इतर—सर्व प्रकारचे बँकांचे व्यवहार होतात.

ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि. व सर्व स्थानिक संस्था यांची बँकर्स आहे.

## ही दिपवाळी

बँकेच्या सर्व हितचिंतकांना भाग्याची व आनंदाची होवो.

श्री. ह. तळवलकर, मॅनेजर.
वि. शं. झिरपे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

## सोनें

| | ( प्रत्येक तोळ्यास ) | | |
|---|---|---|---|
| | सर्वांत ज्यास्त | सर्वांत कमी | सरासरी |
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| १९४१–४२ ... | ५७ १२ ० | ४१ ९ ६ | ४४ ७ ११ |
| १९४२–४३ ... | ७२ ० ० | ४४ १२ ० | ५७ १० १० |
| १९४३–४४ ... | ९६ ४ ० | ६५ ४ ० | ७६ ११ ६ |
| १९४४–४५ ... | ७६ १२ ० | ६१ २ ० | ७१ ७ ४ |
| १९४५–४६ ... | ९७ १२ ० | ६३ ६ ० | ८० ३ ० |
| ऑगस्ट १९४५ ... | ७९ ० ० | ६३ ६ ० | ७३ ८ २ |
| जुलै १९४६ ... | १०४ १२ ० | ८४ ४ ० | ९४ ३ ३ |
| ऑगस्ट ,, ... | ९९ १३ ० | ९३ ६ ० | ९६ ५ ६ |

## चांदी

| | ( प्रत्येक १०० तोळ्यांस ) | | |
|---|---|---|---|
| | सर्वांत ज्यास्त | सर्वांत कमी | सरासरी |
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| १९४१–४२ ... | ९७ ६ ० | ६१ १२ ६ | ६६ ११ ४ |
| १९४२–४३ ... | ११६ ८ ० | ७५ ४ ० | ९४ २ ६ |
| १९४३–४४ ... | १४१ ८ ० | १०१ ८ ६ | १२० ७ ११ |
| १९४४–४५ ... | १४३ ४ ० | ११३ १० ० | १२८ १० ९ |
| १९४५–४६ ... | १५९ ६ ० | ११८ ० ० | १३५ १ ११ |
| ऑगस्ट १९४५ ... | १३८ १२ ० | ११८ ० ० | १२९ १३ ५ |
| जुलै १९४६ ... | १७० ४ ० | १५० ४ ० | १६१ ४ १ |
| ऑगस्ट ,, ... | १७१ १२ ० | १६० ४ ० | १६७ ४ २ |

## व्याजाचे उतरते दर

| | ट्रेझरी बिलें | कॉल मनी ( मुंबई ) | डिपॉझिट ( मुंबई ) ३ महिने |
|---|---|---|---|
| १९४०–४१ ... | ० १४ ३ | [illegible] | १ १/१६ |
| १९४१–४२ ... | ० १३ २ | ९/१६ | [illegible] |
| १९४२–४३ ... | ० १३ ११ | १/४ | [illegible] |
| १९४३–४४ ... | ० १४ ५ | १/४ | [illegible] |
| १९४४–४५ ... | ० ७ १० | १/४ | ९/१६ |
| १९४५–४६ ... | ० ६ ४ | ५/१६ | [illegible] |
| जुलै १९४५ ... | ० ४ २ | १/४ | [illegible] |
| ऑगस्ट ” ... | ० ६ ७ | १/४ | [illegible] |
| सप्टेंबर ” ... | ० ५ १० | १/४ | [illegible] |
| ऑक्टोबर ” ... | ० ५ ३ | १/४ | [illegible] |
| नोव्हेंबर ” ... | ० ५ ६ | १/४ | [illegible] |
| डिसेंबर ” ... | ० ६ ६ | [illegible] | [illegible] |
| जानेवारी १९४६ ... | ० ७ ० | [illegible] | [illegible] |
| फेब्रुवारी ” ... | ० ७ ३ | [illegible] | [illegible] |
| मार्च ” ... | ० ७ ११ | [illegible] | [illegible] |
| एप्रिल ” ... | -- | [illegible] | [illegible] |
| मे ” ... | -- | [illegible] | [illegible] |
| जून ” ... | ० ६ ० | [illegible] | [illegible] |
| जुलै ” ... | ० ६ २ | [illegible] | [illegible] |
| ऑगस्ट ” ... | ० ७ ० | [illegible] | [illegible] |


लेथ जॅक्स,

हँड ब्लोअर्स,

सेंट्रिफ्युगल पंप,

पाणी उपसण्यास योग्य अशा तऱ्हेचे ( बोअर वेल पंप ) वगैरे तयार होतात.

—श्रीसिद्रामेश्वर—


इंजिनियरिंग वर्क्स, अरभावी










पुणें चीफ एजंट :—
न्यू दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पु

★ वृद्धापकाळची तरतूद
★ कुटुंबाचें संरक्षण
★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा
पुणें येथील सुप्रसिद्ध

# कॉमनवेल्थ
## ॲशुअरन्स कंपनी लि.
मध्येंच उतरा.

—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

श्री. म. जोशी,
अ मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र
## लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर

—भाण्डवल—


अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,८०,००,०००

—ःशाखाः—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, सोलापूर, धुळें, चाळिसगांव व फैजपूर (पे–ऑफिस)
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



# सारस्वत
## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१–८–१९४६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,५६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,८५,००० |
| ठेवी | ... | रु. ६५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७१,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम
व्याज : २ टक्के
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह
## बँक लिमिटेड
स्थापना–१९१७

| फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११ |
|---|---|---|

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—ः शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—ःबँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या
केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक. लिमिटेड

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११

—मुख्य कचेरी—
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.
शाखा ५०

**खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.
—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर



## धी बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

( स्थापना १९०६ इ. )

| | | |
|---|---|---|
| शेअरचें वसूल भांडवल | रु. | ७१,७९० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | ८७,४०० |
| एकूण ठेवींची रकम | रु. | ११,२१,००० |
| कर्जाऊ दिलेली रकम | रु. | ३,०६,२०० |
| रोख्यामध्यें व बँकांतील शिल्लक | रु. | ९,५९,००० |

सतत ४० वर्षे 'अ' वर्गांतरी दाखल असलेली ही बँक ठेवीदारांचा विश्वास व सभासदांचें सहकार्य ह्यांचे बळावर आगामी काळामध्यें जनतेची सेवा अधिक प्रमाणांत करण्याची उमेद बाळगते.

**ही दिवाळी सर्वांस आनंदाची जावो.**

र. म. पटवर्धन
मॅनेजर

ग. रा. साने
चेअरमन



यंदाची दिवाळी आमच्या विमेदारांस, प्रतिनिधींस व हितचिंतकांस सुखाची जावो.

*सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या महाराष्ट्रांतील पहिल्या व अग्रेसर*

## 'दि औंध म्युच्युअल'

**लाईफ अॅशुरन्स सोसायटी लि.**

रामनिवास लक्ष्मी रोड, पुणें.

या संस्थेस कोंकण, अहमदनगर, नाशिक व ठाणें जिल्ह्यांसाठीं चीफ एजंट पाहिजेत

गॅरंटी व अपेक्षित अटींसह अर्ज करावेत.

—: वैशिष्ट्य :—

- कायद्याच्या कक्षेंत व्यवहार व प्रतिनिधींना भरपूर मुशाहिरा व वंशपरंपरा कमिशन
काटकसरीचा कारभार, तत्परता व कार्यक्षमता वगैरे



## दि बँक ऑफ सिटिझन्स लि० बेळगांव.

( स्थापना : १९३७ )

★ मजबुती, शहाजोगपणा आणि सेवा ह्यांबावत ★

**९ वर्षांची उत्कृष्ट प्रगति**

—जून अखेरच्या प्रगतीचा आढावा—

—आंकडे—

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | ... | ७,००,००० |
| वसूल भांडवल | ... | ३,३९,३५० |
| खेळतें भांडवल | ... | ५१,१८,०५४ |
| ठेवी | ... | ४६,१४,४९६ |
| निवळ नफा | ... | ५८,४७७ |
| ( ३०-६-४६ ) | | |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरीः—१५१४, मारुतीगली, बेळगांव

शाखाः—खानापूर, निपाणी, चिकोडी, अळणावर, बैलहोंगल, नंदगड, धारवाड, हुबळी, हलीयाळ, कारवार आणि शिरसी

जी. डी. सराफ,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हिज हायनेस श्रीमंत सरकार सांगलीचे राजेसाहेब यांच्या आश्रयाखालीं स्थापन झालेली

# दि सांगली बँक लिमिटेड

( स्थापना १९१६ )

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

( १ ) राव. ह. ब. कुलकर्णी
( २ ) शेठ नि. ए. कोरे
( ३ ) शेठ वा. भ. आरवाडे
( ४ ) शेठ वा. उ. शहा

| | | |
|---|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,००,००० |
| रिझर्व्हस् | ... | रु. २,००,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १०,००,००० |

**हेड ऑफिसः—सांगली ( S. M. C. )**

—शाखा—

( १ ) शहापूर, ( २ ) शिरहट्टी, ( ३ ) तेरदळ, ( ४ ) रबकवी, ( ५ ) कवठें, ( ६ ) मंगळवेढें, ( ७ ) तुपारी ( नाकारी M. S. M. Rly. ), ( ८ ) उगार ( M. S. M. Rly. ), ( ९ ) विलिंग्डन कॉलेज ( जि. सातारा )

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

P. S. MOKASHI
मॅनेजर

## दिपवाळीच्या आनंदांत खरी भर कशानें पडेल?

पवाळीच्या आनंदांत खरी भर कशानें पडेल?

अल्पावधींत सर्व हिंदुस्थानभर आपल्या कार्यक्षमतेमुळें लोकप्रिय झालेल्या सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनीची पॉलिसी अगर एजन्सी घेऊन आपल्या कौटुंबियांना आर्थिक सुस्थिरता व संपन्नता प्राप्त करून दिल्यानेंच तुमच्या आनंदांत खरी भर पडेल.

# दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कं. लि., पुणें

शाखा—
कराची—मॅनेजर मि. प्रीतमदास भगवानदास
नागपूर—मॅनेजर मि. के. एन. सगदेव
हुबळी—मॅनेजर मि. एम. पी. चितळे

स्पेशल एजन्टस्—
पुणें—मे. इंटरनॅशनल कमर्शियल कॉर्पोरेशन
श्री. जी. आर. देशपांडे
श्री. जी. जी. केतकर
मेसर्स पंडित ॲण्ड को.
मि. डी. के. शिकनिस
सोलापूर—सौ. नंदिनीबाई भागवत
बेळगांव—श्री. बा. ग. मेहिरे
अहमदनगर—श्री. एम. आर. बेद्रे
लातूर—श्री. टी. एन. फटाले

**चीफ एजन्टस**
मुंबई, ठाणें, रत्नागिरी—मे. वसंत प्रभा आणि कं.
बेळगांव व विजापूर—मे. प्रतिभा एजन्सी
सातारा—मे. प्रभा एजन्सी
इंदूर—मे. सुभाष एजन्सी
हैद्राबाद दक्षिण—मे. मंगल एजन्सी
अहमदनगर—मे. अरुणोदय आणि कंपनी
कोल्हापूर—मे. स्वस्तिक एजन्सी

**ऑर्गनायझिंग मॅनेजर**
श्री. एस. आर. केतकर, बी. ए. (ऑनर्स) चिपळूण.

**मॅनेजर**
श्री. व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.

**हेड ऑफिस—८६६ सदाशिव पेठ, पुणें शहर.**

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.